
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे



# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष पंधरावे / अंक १० / ऑक्टोबर २०१४

## संपादकीय

## पोप आणि डार्विन

'कॅथॉलिक ख्रिस्ती' समाजाचे धर्मगुरू पोप फ्रान्सिस यांनी डार्विनचा 'उत्क्रांतिवाद' (Evolution) आणि विश्वाच्या उत्पत्तीमागील सिद्धान्त - 'महाविस्फोट' या संकल्पना ख्रिस्ती धर्माच्या आड येत नाहीत असे विधान करून एकच खळबळ माजवून दिली. व्हॅटिकन शहरामधील पाँटीफिकल ॲकॅडेमी ऑफ सायन्सेसच्या हिरवळीवर आपल्या आधीचे धर्मगुरू बेनेडिक्ट सोळावे यांच्या अर्धपुतळ्याचे उद्घाटन करतांना त्यांनी हे विधान केले (मंगळवार, २८ ऑक्टोबर २०१४). महत्त्वाची बाब म्हणजे, याच बेनेडिक्ट सोळावे यांनी रचनावादाचा (Creationism) एक नवीन अवतार म्हणजे 'कल्पक रचनावाद' (Intellgent Design) मांडत, 'उत्क्रांतिवाद' नाकारला होता. वास्तविक १९६० पासूनच्या आधीच्या पोपांनी सृष्टीच्या निर्मितिसंबंधातील महाविस्फोटवाद (Big Bang) आणि डार्विनचा उत्क्रांतिवाद (Evolution) अन् बायबलचा रचनावाद (Creationism) यांमध्ये वितुष्ट असण्याचे कारण नाही असे सांगून टाकले होते. तरीही गेल्या ३०-४० वर्षांत, विशेषतः अमेरिकेमध्ये उत्क्रांतिवादाला विरोध म्हणून रचनावादाचा अत्यंत आग्रहाने पाठपुरावा केला गेला. अमेरिकेतील काही राज्यांमध्ये तर हा वाद इतका विकोपाला गेला की, शालेय पुस्तकांमधून उत्क्रांतिवादाला काढूनच टाकावे किंवा उत्क्रांतिवाद आणि रचनावाद ही दोन्ही गृहीतके म्हणून शिकवावीत असा आग्रह धरला गेला, आणि तो मान्यही झाला. अमेरिका हे जगातील सर्वांत प्रगत, विशेषतः वैज्ञानिक प्रगतीमध्ये एक अव्वल दर्जाचे राष्ट्र गणले जाते. तरीही नुकत्याच केल्या गेलेल्या एका चाचणीमध्ये सुमारे चाळीस टक्क्यांहून अधिक अमेरिकनांना वाटते की, आजचा मानव हा देवानेच निर्माण केला आहे. सुमारे तीस टक्के लोकांना उत्क्रांतिवाद मान्य आहे, पणं देवालाच त्याचा रचनाकार मानून. फक्त एकोणीस टक्के लोकांचे म्हणणे असे आहे की, उत्कांतिवादाचा आणि देवाचा काडीचाही संबंध नाही. विज्ञान भोळसट समजुतींना थारा देत नाही हीसुद्धा एक अंधश्रद्धाच असल्याचे यातून दिसून येते.

पोप फ्रान्सिस यांनी उत्क्रांतिवाद आणि महाविस्फोटाच्या सिद्धान्ताला दिलेली संमती ही त्यांच्याच शब्दात वाचावी लागेल. ते म्हणतात,

"Evolution in nature is not inconsistent with the notion of Creation, because evolution requires the Creation of beings that evolve"

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

आणि

"The Big Bang,which today we hold to be the origin of the world, does not contradict the intervention of the divine Creator but, rather requires it."

पोपमहाशयांच्या या विधानावरून 'उत्क्रांतिवाद' किंवा 'महाविस्फोटवाद' त्यांनी मान्य केला आहे हे अजिबात खरे नाही. रचनावाद आणि उत्क्रांतिवाद परस्परपूरक नाहीत. उत्क्रांतिवाद कुठलीही पूर्वनियोजित रचना किंवा रचनाकार मानत नाही. दोन्ही विचारांचे स्रोतच नाही तर प्रमाणेही भिन्न आहेत. या विवेचन किंवा निष्कर्षप्रक्रियेत कुठलाही समन्वय असू शकत नाही. वास्तविक जगाच्या निर्मितीच्या उगमाचा आधार बायबलमधील वचनांमध्ये दिला आहे. त्या वचनांप्रमाणे पृथ्वीची निर्मिती सहा दिवसांत झाली आणि सातव्या दिवशी देवाने विश्रांती घेतली. गेली दोन हजार वर्षे ख्रिस्ती धर्माचे सर्व धर्मगुरू आणि अनुयायी याच संकल्पनेचा हिरिरीने पाठपुरावा करीत आहेत. युरोपमध्ये सोळाव्या शतकानंतरच्या प्रबोधनयुगामुळे विज्ञानाने एक वेगळी दिशा घेतली. सर्व सिद्धान्तांची तपासणी तर्क आणि युक्तिवादावर व्हायला लागली. हा तर्क आणि युक्तिवाद म्हणजे एखादा वकिली वाद नसून, प्रमाणे आणि त्यांची सिद्धता यांच्या ऊहापोहामधून येणारा निष्कर्ष म्हणजेच विज्ञानाचे निष्कर्ष मानले जाऊ लागले. बायबलमधील वचनांचा अर्थ लावण्याच्या अनेक शाखा विकसित झाल्या, त्या प्रामुख्याने भाषाशास्त्राच्या अंगाने आहेत; पण मूळ वचनांच्या सिद्धतेबद्दल चर्चा करण्याचा कोणलाही अधिकार नाही. उलट तसा प्रयत्न कोणी केला तर त्याला पाखंडी (Heretic) ठरवून धर्मबाह्य करण्यात येई, आणि म्हणूनच सृष्टीचा काय किंवा मनुष्याच्या उत्क्रांतीचा सिद्धान्त काय, हा बायबलमधल्या वचनांना छेद देणारा असूच शकत नाही. अर्थातच सृष्टी सहा दिवसांत निर्माण झाली ही कल्पना कितीही कोलांटउड्या मारल्या तरी मान्य होणे शक्य नव्हते. म्हणूनच बायबलमधील वचने म्हणजे 'रचनावाद', आणि या संबंधातील विज्ञानाने केलेली उकल म्हणजे 'उत्क्रांतिवाद' यांच्यातील संघर्ष चालू झाला आणि आजही तो चालू आहे.

वास्तविक या संघर्षाची सुरुवात ही सतराव्या शतकाच्या आरंभी गॅलिलिओने मांडलेल्या आपल्या निष्कर्षांपासून झाली. बायबल किंवा टालेमी यांच्या भूकेंद्रित (Geocentric) विश्वरचनेला नाकारत गॅलिलिओने कोपर्निकसच्या सूर्यकेंद्रित (Heliocentric) सिद्धान्ताला पोषक गणिते मांडली. साहजिकच त्याचे हे सांगणे बायबलच्या वचनांना संमती देणारे नव्हते. त्यामुळे त्याच्यावर चौकशीची कारवाई करून त्याला पाखंडी ठरवून धर्मबाह्य करण्यात आले. म्हणूनच, वर उल्लेख केलेल्या पोपमहाशयांच्या विधानांमध्ये फक्त एवढेच सांगितले गेले आहे की, विज्ञान आणि या रचनावादामध्ये संघर्ष असण्याचे काही कारण नाही. वास्तविक हा संघर्षच आहे आणि कुठल्याही अंगाने उत्क्रांतिवाद हा रचनावादाचे समर्थन करू शकत नाही. पोपमहाशयांची विधाने बारकाईने पाहिल्यास लक्षात येईल की आजही ते बायबलमधील रचनावादाचाच पाठपुरावा करीत आहेत. पोपमहाशयांचे क्रांतिकारक विधान जे आहे ते म्हणजे,

"When we read the Creation story in Genesis we run the risk of imagining that, God was a magician, with a majic wand which is able to do everything"

पुढे ते म्हणतात,

(पृष्ठ क्र. ३९ वर)

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष पंधरावे / अंक १० / ऑक्टोबर २०१४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १९ वे/अंक ४ था)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | अरुणिमा सिन्हाची स्फूर्तिगाथा | श्री. नरेंद्र गोळे | ३ |
| ३) | सगुण-निर्गूण | श्री. परमानंद शेलार | ५ |
| ४) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | ६ |
| ५) | संस्कृत भाषेची समृद्धता, गेयता आणि काव्यमयता | रेवती मिलिंद कुलकर्णी | १२ |
| ६) | नर्मदा परिक्रमा (भाग : ९) | श्री. अरविंद ओक | १६ |
| ७) | भारतावर प्रेम करणारा साहेब - जिम कॉर्बेट | प्रा. सुभाष गं. शिंदे | २० |
| ८) | अभियांत्रिकी नीतिशास्त्र | सौ. अनघा गोखले | २३ |
| ९) | थायलंडच्या सुरत थानी येथे संपन्न झालेले आगळेवेगळे कृतिसत्र | डॉ. सुधाकर आगरकर | २५ |
| १०) | भास्कर ९०० : चित्रदर्शन | | ३० |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- ❖ आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- ❖ हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- ❖ शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- ❖ आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- ❖ आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- ❖ आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- ❖ दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- ❖ आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- ❖ www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- ❖ वार्षिक देणगीमूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- ❖ कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# अरुणिमा सिन्हाची स्फूर्तिगाथा

*अपंगत्वावर मात करून हिमायलयातील सर्वोच्च शिखर गाठणाऱ्या अरुणिमा सिन्हाची कहाणी बोधप्रद अशीच आहे. - संपादक*

काही गुंडांनी चालत्या गाडीतून फेकल्यामुळे एक पाय गमावलेल्या माजी राष्ट्रीय व्हॉलीबॉलपटू अरुणिमा सिन्हा हिने नवीन इतिहास रचला आहे. जगातील सर्वोच्च शिखर असलेले माउंट एव्हरेस्ट पादाक्रांत करणारी ती पहिली अपंग भारतीय ठरली आहे.

टाटा समूहातर्फे आयोजित करण्यात आलेल्या 'इको एव्हरेस्ट' मोहिमेअंतर्गत अरुणिमा, मंगळवारी सकाळी १०.५५ ला ८,८४८ मीटर उंचीच्या, हिमालयाच्या सर्वोच्च टोकावर पोहोचल्याची माहिती नेपाळ पर्यटन मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी दिली.



उत्तर प्रदेशची रहिवासी असलेली अरुणिमा १२ एप्रिल २०११ रोजी लखनऊ येथून दिल्लीला जात असताना काही गुंडांनी तिला पद्मावती एक्स्प्रेसमधून बाहेर फेकले होते. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या अरुणिमाच्या डाव्या पायावर शस्त्रक्रिया करून डॉक्टरांनी डावा पाय गुडघ्यापासून काढून टाकला.

या मोहिमेवर निघण्याआधी वृत्तवाहिन्यांशी बोलताना अरुणिमा हिने सांगितले की, मी रुग्णालयात असताना प्रत्येकाला माझी काळजी वाटत होती. मात्र माझ्याकडे लोकांनी दयाबुद्धीने पाहू नये यासाठी काहीतरी वेगळे करण्याचा विचार माझ्या मनात घर करून होता. त्यामुळे जेव्हा एव्हरेस्ट मोहिमेबद्दल माहिती मिळवली, तेव्हा मी माझा भाऊ आणि प्रशिक्षकांना सांगितले. त्यांनीही मला प्रोत्साहन दिले.

२०१२ साली उत्तरकाशी येथील शिबिरात अरुणिमा, टाटा स्टील ॲडव्हेंचर फाउंडेशनशी जोडली गेली. तिथे एव्हरेस्टवर चढणारी पहिली भारतीय महिला असलेल्या बचेंद्री पाल यांनी तिला प्रशिक्षण दिले होते. २०१२ सालीच ६,६२२ मीटर उंचीचे लडाखमधील छामसेर कांग्री हे उंच शिखर तिने काबीज केले. मात्र एव्हरेस्ट सर करण्याची तिची इच्छा होती.

आता जेव्हा तिने एव्हरेस्ट शिखर सर केले त्यानंतर अरुणिमा[१] असे म्हणाली की[२], ''सन्मार्गाचा शोध घेणाऱ्या युवकांच्या मनांत, चांगले काम करण्याची प्रेरणा निर्माण करू शकेन, तेव्हाच मला दुसऱ्यांदा एव्हरेस्ट शिखर सर केल्याचे समाधान प्राप्त होईल.''

जे शोधार्थ जगी तरुण फिरती, सन्मार्ग तो गाठण्या ।
आकांक्षा युवकांत त्या करीन मी जागी, जगा जिंकण्या।।
हे होईल खरेच साध्य दिनि ज्या, मानेन मी पावले ।
पुन्हा तेच हिमाद्रितुंग, मजला वशही असे जाहले।।

- अरुणिमा सिन्हा

अरुणिमा सिन्हाने सरगमाया शिखरास गवसणी घातली. रोज खिन्न करणाऱ्या वृत्तांनी भरलेल्या वृत्तपत्रांत हे अत्यंत उत्साहजनक वृत्त दिसून आले.

सुरुवात कशी झाली यावर बऱ्याच घटनांचा शेवट अवलंबून असतो.

लहान-सहान अपयशांनी, अपघातांनी, आघातांनी, निराशाजनक वृत्तांनी खचून जाणाऱ्यांना; हताश होणाऱ्यांना उमेदीचे नवे आकाश दाखवणाऱ्या अरुणिमास मानाचा मुजरा! तिच्या देदीप्यमान यशाने लाखो निराश मनांना उज्ज्वल भविष्याचे वेध लागोत हीच प्रार्थना!!

अरुणिमा म्हणजे उमलता सूर्यप्रकाश. रात्रीच्या घोर अंधारातून नवसूर्याची कोवळी किरणे बाहेर पडून, उज्ज्वल भवितव्याच्या आशेचा रक्तिम प्रकाश प्रकट होणे म्हणजे अरुणिमा. ही अरुणिमा, भारतीय नवयुवकांच्या मनात विजिगीषू उमेदीचा वेध प्रज्वलित करो, हीच सदिच्छा!

[१] राष्ट्रीय व्हॉलीबॉलपटू अरुणिमा सिन्हाला, १२ एप्रिल २०११ रोजी रेल्वे अपघातात पाय गमवावा लागल्यानंतर, लोक स्वतः 'बेचारी' म्हणू लागलेले सहनच होईना. त्या दुर्घटनेपासून उण्यापुऱ्या दोन वर्षांच्या कालावधीत, २१ मे २०१३ रोजी सकाळी १०.५५ वाजता, तिने एव्हरेस्ट शिखर सर करून, होतकरू तरुणांकरता देदिप्यमान आदर्श प्रस्थापित केला.

[२] तेव्हा ती म्हणाली होती, ''जिस दिन मैं राह ढूँढते युवाओं के जिगर में अच्छे काम के प्रति आग जला सकूँ, तब सही मायने में मेरा अगला एव्हरेस्ट समिट होगा!''

**नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

## *भारताच्या राष्ट्रीय ग्रंथालयाविषयी*

- भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय कोलकोता येथे आहे.
- भारताच्या राष्ट्रीय ग्रंथालयाची स्थापना १८३५ या वर्षी झाली.
- भारताचे राष्ट्रीय ग्रंथालय हे भारतीय राज्यघटनेतील परिशिष्ट सात, कलम ६२ अन्वये स्थापन करण्यात आले.
- भारताच्या राष्ट्रीय ग्रंथालयाची स्थापना 'कलकत्ता पब्लिक लायब्ररी' या नावाने झाली.
- कलकत्ता पब्लिक लायब्ररीचे 'इम्पीरिअल लायब्ररी' असे नामकरण १९०३ या वर्षी करण्यात आले.
- १९०३ मध्ये दि इम्पीरिअल लायब्ररीचे ग्रंथपाल म्हणून जॉन मॅकफरलेन यांची नियुक्ती लॉर्ड कर्झननी केली.
- कलकत्ता पब्लिक लायब्ररीचे नामकरण 'इम्पीरिअल लायब्ररी' असे गव्हर्नर लॉर्ड कर्झन यांनी केले.
- सन १९२८ मध्ये भारत सरकारने 'इम्पीरिअल लायब्ररीची पुनर्रचना करण्याच्या उद्देशाने जे. एच. रिचे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली.
- इम्पीरिअल लायब्ररीचे रूपांतर राष्ट्रीय ग्रंथालयामध्ये १९४८ या वर्षी करण्यात आले.
- भारतीय राष्ट्रीय ग्रंथालय राष्ट्राला १९५३ या वर्षी मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या हस्ते अर्पण केले.
- भारतीय राष्ट्रीय ग्रंथालयाचे पहिले ग्रंथपाल बी. एस. केशवन हे होते.
- भारतीय राष्ट्रीय ग्रंथालय मनुष्यबळ विकास मंत्रालय - भारत सरकार यांच्या निमंत्रणाखाली चालते.
- भारतीय राष्ट्रीय ग्रंथालय ३६२ दिवस उघडे असते.
- सेंट्रल रेफरन्स लायब्ररी कोलकोता येथे आहे.
- भारतीय राष्ट्रीय ग्रंथालयामध्ये सूची व संदर्भ विभागाची स्थापना १९५१ या वर्षी झाली.
- भारतीय राष्ट्रीय ग्रंथालय हे डिपॉझिटरी ग्रंथालय म्हणूनही कार्य करते.
- भारतीय राष्ट्रीय ग्रंथालय हे ग्रंथालय क्षेत्रातील सर्वोच्च मंडळ म्हणून ओळखले जाते.

**संकलन**
चंद्रकांत शिंगाडे

आयुष्यात भावनेपेक्षा कर्तव्य मोठे असते.

# सगुण-निर्गुण

*देवपण कशात आहे याचा लेखकाने थोडक्यात आढावा घेतलेला आहे. हा लेख विचार करायला प्रवृत्त करतो.*
*- संपादक*

अनेक जण म्हणतात,'मानला तर देव, नाहीतर दगड'. परमेश्वर अस्तित्वात आहे की नाही हा विषय चर्चेचा वा वादाचा नसून संशोधनाचा आहे; वा ठरेल! सर्व भारतीय सण, उत्सव याच्याभोवती फेऱ्या मारताना दिसत आहेत, याला 'रूढी वा परंपरा' कारणीभूत आहेत की, आपली हिंदू संस्कृती? 'व्रतवैकल्य', 'उपासतापास' हे सारे कुणी निर्माण केलेय?

निर्माणकर्ता, पालनकर्ता व संहारकर्ता ही ईश्वराची तीन रूपे आपण मानतो व त्यांवर विश्वास ठेवतो; याला कारण काय असावे? आपले धर्मग्रंथ की पोथ्या-पुराणे? श्रद्धा-अंधविश्वास की अनुकरण? विज्ञान वा तर्कशास्त्रावर घासले तरी याचे उत्तर सापडणारही नाही.

आचार्य अत्रे यांनी याविषयी एका अग्रलेखात म्हटलेले होते की, ''देवही दगडाचा असतो व देवळाच्या पायऱ्याही दगडाच्या असतात. एकावर आपण पाय ठेवतो व दुसऱ्याची आपण पूजा करतो! प्रत्येक गोष्टीला दोन बाजू असतात; चांगली किंवा वाईट. प्रत्येकाने चांगल्याचा स्वीकार करावा व वाइटास नकार द्यावा.

तत्त्वचिंतक सांगतात की, '' उजव्या हाताने जे दिले ते डाव्या हातालाही कळता कामा नये!'' हे सांगण्यामागे कारण काय असावे? देताना ''अहंपणा'' असू नये व घेताना ''लाचारी'' असू नये.

'अध्यात्म' काय वा धर्म काय, अफूची गोळी आहे ही कारण मनुष्याला याचे वेड वा व्यसन लागले तर ते सुटू शकत नाही, याचे कारण काय असावे?

आमच्याकडे धुणीभांडी करायला एक मोलकरीण यायची. तिचे काम नेटके व स्वच्छ असायचे. तिचा मुलगा माझ्याकडे चित्रकला शिकायला यायचा. त्याला एक वाईट सवय होती. जरा काही काढताना चुकले की तो 'ओ, माय गॉड' म्हणायचा! मी विचारायचो, अरे राजा! माय गॉडचा अर्थ कळतो का? तो म्हणायचा, 'अरे देवा!' असे म्हणायला मला आवडत नाही. लाज वाटते! कारण देवाला फुलफॉर्म नाही! पण गॉडला आहे! मग सांग गॉडचा फूलफॉर्म काय? त्यात काय, ते सोपे आहे. जी स्टॅण्ड फॉर जनरेटर, ओ स्टॅण्ड फॉर ओरिजनेटर आणि डी स्टॅण्ड फॉर डिस्ट्रायर! मी त्यास म्हणालो, बरोबर आहे,पण आपल्या शिवशंकरालाही असेच म्हणतात - रक्षणकर्ता, पालनकर्ता व संहारकर्ता म्हणजे तो तुझा गॉड, तसाच आमचा हा शिवशंकरही आहे. तो ओशाळला.

प्रसंग असा घडला की मी ठाण्याच्या तलावपाळीवरून जात असताना नेहमी भर दुपारच्या उन्हात आडवे पडून काही अपंग भिकारी त्यांच्या कल्पनेप्रमाणे परमेश्वर साकारीत, लोक त्यांनी काढलेल्या चित्रांवर पैसे टाकीत, मग ते पैसे उचलून जिथून आले तिकडे परत जात. त्यांना देव दिसतो, मला का नाही दिसला? व दिसत! काही दिवसांनंतर मला कळले की काही नास्तिकांनी पोलिसांत तक्रार करून त्यांची कला जमीनदोस्त केली! मला वाईट वाटले, स्वतःला करता येत नाही. दुसरे करतात त्यांना करू द्यायचे नाही, ही कसली दरिद्री वृत्ती? त्यांना नाही शिक्षण वा ना कुणाचेही

(पृष्ठ क्र. १५ वर)

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*श्री. साने यांच्या विचारपरिपूर्ण लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

## प्रस्ताविक

### ''अंधश्रद्धाच नव्हे, तर श्रद्धासुद्धा नाकारली''- शरद बेडेकर

हे शीर्षक 'बदलता महाराष्ट्र' ह्या चर्चासत्रातील एका ज्येष्ठ विचारवंत प्रा. शरद बेडेकर यांनी मांडलेल्या विचारावर आधारलेले व लोकसत्तेने योजलेल्या पुणे येथील कार्यक्रमात मांडले गेले! ह्याचा गंभीर विचार करणे आवश्यक आहे!! त्यांतले दुसरे काही विचार असेच धक्कादायक आहेत, पण ते विचार 'अंधश्रद्धा विरोधी कायदा' कारणाऱ्या सत्ताधारी राजकीय नेतृत्वाला व काही N.G.O. संस्थांच्या चळवळीला संबोधून मांडले आहेत असे वाटते. हा परिसंवाद अं. नि. समितीचे कार्याध्यक्ष अविनाश पाटील व सनातन संस्थेचे माजी प्रवक्ते अभय वर्तक यांच्यात झाला. त्यातले एक विधान बघा!!




भारतीय विचारवंतांचा गुरू


## भारतीय विचारवंतांचे गुरू

''श्रद्धेमुळे मूलभूत विचार करण्याची शक्ती मारली जाते, त्यातून माणूस अधिकाधिक दैववादी व कर्तृत्वहीन होतो त्यामुळे अंधश्रद्धांपासूनच नव्हे तर श्रद्धांपासूनही सावध राहणे आपल्या हिताचे आहे. 'भारताला' जगात 'आघाडीवर' राहायचे असेल, तर आपण श्रद्धाळू, भाविक, भोळे भाबडे न राहता वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून जुनाट श्रद्धा व आपले 'सनातनतत्व' साफ नाकारले पाहिजे.

अंधश्रद्धा या शब्दाला सध्या एका सामाजिक चळवळीचा संदर्भ व अर्थ प्राप्त झाला आहे, पण तो Superstition ह्या इंग्रजी शब्दावरती आधारलेला जास्त प्रमाणात दिसतो. त्याच्या सध्याच्या प्रचलित अर्थाला तो प्राप्त झाला आहे. तो अर्थ त्याच भाषेत 'A belief or notion not based on Reason, misdirected popular belief असा केलेला आहे. उघडपणे तो विचारवंत पाश्चात्त्य संस्कृतीतील संदर्भावर भिस्त ठेवतो आहे. कारण 'भौतिकवाद' (materialism) हा तत्त्वज्ञान शास्त्रावर 'बुद्धी' ह्या 'अदृश्य संकल्पनेवर' जाणला जातो. पण ह्या बुद्धीला 'दृश्य' स्वरूपात या 'इंद्रियाला' जाणता येत नाही. शिवाय ही बुद्धीसुद्धा भ्रष्ट, अज्ञानी व corrupt होऊ शकते. तिलाही सत्त्व, रज, तम या त्रिगुणांची शपथ आहे वा लागण आहे!

## श्रद्धाचा बीज अर्थ

पण 'श्रद्धा' हा शब्द मुळातच संस्कृत भाषेतील आहे व त्या शब्दाला कमीत कमी १०,००० वर्षांइतका भारतीय वैदिक ज्ञानाचा सांस्कृतिक व सामाजिक अर्थ आहे. तेव्हा 'थोर विचारवंत' श्री. शरद बेडेकर ज्या 'सनातन' तत्त्वाचा



‘श्रद्धा’चे ‘बीज’ भारतभूमी

धिक्कार करतात त्या तत्त्वाचा खरा आधार आहे. हे त्या ‘श्रद्धा’ शब्दाचे **‘बीज ज्ञान’** वेदात आहे.

तो आधार ‘वैदिक’ ज्ञानाच्या श्रुती ज्ञानावर आधारलेल्या ‘सनातन धर्माचा’ आहे. हा धर्म (Religious) म्हणजे Religion नव्हे, तर विश्वाच्या निर्मितीचे जे ज्ञान भारतीय संस्कृतीने जिवापाड जपले आहे. त्यावर आधारलेला आहे.

**बुद्धी विरुद्ध श्रद्धा**

तो संदर्भ आहे. ज्या पाश्चात्त्य संस्कृतीत Reason म्हणजे बुद्धी असे जाणले जाते, त्या Materialist भौतिक विज्ञानात विश्वाच्या उत्पत्तीबद्दल पूर्ण ज्ञान नाहीच, पण मधूनमधून नवनवे Hypothesis देखील बुद्धीलासुद्धा न पटणारे ठरले आहेत. जसे Big Bang Theory, subatomic particles Theory, Relativity वगैरे वगैरे. एवढेच नव्हे तर अमेरिकन सुप्रीम कोर्टाच्या निवाड्याप्रमाणे ‘विश्वनिर्मात्याला, 'Intelligent Designer' असा शब्द देऊन तो युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमात घ्यावा, ही सामाजिक विनंती कोर्टाने धुडकावून दिली आहे. म्हणजे जी संकल्पना ‘देव’ 'God' ‘अल्ला’ वगैरे शब्दांवर दर्शविली जाते त्या शब्दांचे ‘मूर्त’ स्वरूप वा अर्थ, बुद्धीच्या मार्फत शोधण्याचा ‘शैक्षणिक प्रस्ताव’ धिक्कारला आहे. कारण काय तर 'It is a backdoor Entry to Religion in Education.' ही तर समाजाला ज्ञानशोध घेण्याचाही प्रतिबंध करणारी ‘कायदेशीर अमान्यता’ आहे!! याचाच अर्थ, ह्या **‘ईश्वर, देव, परमात्मा’ वगैरेंनी जाणल्या जाणाऱ्या इतर ‘शास्त्राचा व ज्ञानपद्धतींचा’ धिक्कार आहे,** कारण उघड आहे की, ‘भौतिकवादी बुद्धी’ या ‘मानवी ज्ञान उपकरणाने जाणणे अशक्य आहे; पण सत्य ज्ञानाची, absolute Truth जाणण्याची दारे मानवजातीला बंद केली आहेत. तेव्हा ‘बुद्धीखेरीज’ मानवी समाजाला ज्या नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध आहेत. त्या कोणत्या हे जाणणे महत्त्वाचे ठरेल. त्यामुळे ह्या संकल्पनेचा या साधनक्रियेचा संदर्भ, अर्थ व क्रिया कोणत्या? त्याचे शास्त्र कोणते, ते पाहाणे प्रस्तुत ठरेल!!

**नरेन्द्र मोदी, श्रद्धा व भगवद्‌गीता**

आता नुकत्याच झालेल्या प्रसंगी नरेन्द्र मोदी या भारताच्या पंतप्रधानांनी जो ग्रंथ, ‘श्रीमद् भगवद्‌गीता’ जपानच्या अध्यक्षांना भेट दिलेल्या प्रसंगाने, आपल्या स्मृतीत ताजा आहे, व त्या ग्रंथाचा ‘भारतानेच नव्हे तर तर सर्व जगाने आदराने स्वीकार व आदर करावा’ असा उल्लेख जपानमध्ये ‘क्योटोला’, झाला, त्याचा संदर्भ व अर्थ शोधू या!! यात एक अडचण ही आहे की ‘श्रद्धा’ या शब्दाने सूचित होणाऱ्या अदृश्य ज्ञानसाधनेचा वा शक्तीचा उपयोग करावा लागतो त्या साधनेची प्रत्यक्षता प्रकट करणे, ह्या ‘योग’ शास्त्राचा परिचय, आज थोड्या अभावानेच आहे व त्याची पुनर्स्मृती जागृत करणे आवश्यक ठरते आहे!!

**तो भगवद्‌गीतेतला संदर्भ आहे १७ व्या अध्यायातील ३ऱ्या श्लोकाचा!!** ह्याचा संस्कृत भाषेतील अर्थ, लोकमान्य टिळकांनी केलेला व महायोगी

अरविंद घोष यांनी केलेला ते विस्तृतपणे बघू या. कारण प्रश्न तेवढाच महत्वाचा व भारतीय संस्कृतीतील ‘बीज’ अर्थ पुन्हा




**महायोगी अरविंद घोष**

जनमानसाच्या प्रचलित ज्ञानजाणीव व ज्ञानक्रियामध्ये आणणे आज आवश्यक झाले आहे. **‘‘सत्त्वानुरूपा सर्वस्थ ‘श्रद्धा भवति भारत। श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धःस एव सः ॥३॥**

**लो. टिळक यांचे भाषांतर**

श्रद्धा हे भारत त्यांच्या सत्त्वाप्रमाणे म्हणजे प्रकृतिस्वभावाप्रमाणे होत असते. त्याप्रमाणे तो बनत असतो. (दुसऱ्या श्लोकात ‘सत्य’ शब्दाचा अर्थ देहस्वभाव, बुद्धी, किंवा ‘अंतःकरण’ असा आहे. दुसऱ्या श्लोकातील ‘स्वभाव’ आणि तिसऱ्या श्लोकातील ‘सत्त्व’ हे दोन्ही शब्द या ठिकाणी समानार्थी आहेत.)



Supplement, All India Magazine, 1st September 2014, p. 53

*This is the decisive discovery of Yoga ... the crowning realisation that there is within us a source of immeasurable force, immeasurable intelligence, immeasurable joy far above the possibility of weakness, above the possibility of ignorance, above the possibility of grief which we can bring into touch with ourselves and, under arduous but not impossible conditions, habitually utilise or enjoy.*

CWSA 13: 16-17

*Sri Aurobindo*

**योगाचा निर्णायक शोध**

महायोगी श्री. अरविंद यांचे भाषांतर व टीका पाहू या.

The faith of each man takes the shape given to it by his stuff of being, o, Bharata. This Purushathis soul in Man, is as it were, made of 'Shraddah', a faith , a will to be a belief in itself and existence and whatever is that will, faith or constituting belief in him, **he is that and that is he."**

**"If we look into this pregnant saying a little closely, we find that this single line contains implied in its few words forceful words almost the whole theory of the modern gospel of pragmatism. For of a man or the soul in a man consists of the faith which is in him, taken in this deeper sense, then, it follows that the Truth which he sees and wills to live is for him the Truth of his being, The Truth of himself that he has created or is creating and there can be for him no other real Truth.**

This Truth is a thing of his inner and outer action, a thing of his becoming, of the soul's dynamics not of that in him which never changes.

He is what he is today by some past wll of his nature sustained and continued by a present will to know, to believe and to be in his intelligence and vital force and whatever new turn is taken by this will and faith active in his very substance that he will tend to become in the future.

We create our own Truth of existence in our own action of mind and life, which is another way of saying that we create our own selves, we are our own makers. But very obviously this is only one aspect of the Truth."

‘श्रद्धा’ ह्या शब्दाचा एक अर्थ वामन शिवराम आपटे हे त्यांचा डिक्शनरीत देतात -

2. Belief in "Divine revelation"

प्रत्येकाच्या मनात एक आदर्श व्यक्ती असलीच पाहिजे.

ह्याचाही अर्थ भारतीय संस्कृतीच्या आधाराने लावला पाहिजे. जी गोष्ट भौतिक इंद्रियांना दिसत नाही, तिला अंतर्ज्ञानाने योगशास्त्रातील क्रियांनी 'साक्षात्कार' करणे, असा होईल.

जेव्हा एखाद्या हापूसच्या आंब्याच्या वाढीकडे Microscope ने पाहिले तर हा Alfanso जातीच्या आंब्याचे बीज आहे व त्याला अतिशय गोड अशी फळे येतील व त्याच्या परिपूर्ण पिकण्याच्या क्रियेनंतर त्याच आंब्याच्या तोडीचे 'बीज' त्यात निर्माण होईल हे कसे जाणणार? ह्या जाणण्याच्या ज्ञानक्रियेचे वर्णन भौतिक इंद्रियांना गोचर नाही. जसे Human Logic यावर अनेक ग्रंथ पाश्चात्त्यांनी लिहिले आहेत, पण एखाद्या वैज्ञानिक ज्ञानाच्या क्रियेमध्ये जो बोध होतो तो मानवी शरीरातील बुद्धी, चक्षू, मेंदू ह्यांच्या अज्ञात क्रियांनी होतो. त्या क्रिया कोणत्या व त्याचा **समजा, 'रसात्मक' क्रियेचा तर्काने शोध लावायचा झाल्यास** त्याला हापूस आंब्याची गोडी ह्या जमिनीत लावलेल्या वाढीने (बीजाने) होणार आहे. ही पूर्णपणे मानवी ज्ञानाची प्रक्रिया, तर्कशास्त्र व यंत्रे यांनी होणार आहे. एवढेच नव्हे तर ह्या बीजात हा प्लॅन अंतर्भूत आहे, शिवाय हा हेतू 'Motive' त्या बीजात सामावलेला आहे त्याचा उद्देश आंब्याच्या जातीच्या अनंतापर्यंत चालणारा जीवनप्रवाह आहे. त्याची **'किल्ली'** आहे, पण हे भौतिक विज्ञानानेच व मानवी बुद्धीने होणार आहे हीसुद्धा एक तऱ्हेची 'श्रद्धाच' आहे!! त्यामुळे ही श्रद्धा फक्त विचारवंत श्री. शरद बेडेकर व तटस्थ व्यक्तिसमूहाचा गट यांची श्रद्धा आहे असे म्हणावे लागेल. शिवाय हे ज्ञान अनेक पिढ्या व युगांनंतर मानवी समाजाला होणे शक्य आहे, असे असेल तर हा हेतू "Aspiration" ह्या **अंभीप्सा** 'आत्मिक' चिजेचा आहे. पण उलट अध्यात्मशास्त्राचे काय म्हणणे आहे हे जाणण्याची आवश्यकताच एक 'अंधश्रद्धा' आहे व ती सनातन तत्त्वांवर आधारलेली असल्याने त्याज्य आहे, असे मानणाऱ्या गटामध्ये कुठचा 'Scientific Temper' व वैज्ञानिक सत्य जाणण्याचे 'स्वभावशास्त्र' आहे हे तपासून पाहावे लागेल ना!

खुद्द मानवी जन्म, मृत्यू व स्त्रीपुरुष संयोगाने मानवी बीजाची अनंत काळपर्यंत चालणारी चैतन्यसातत्याची क्रिया कोणी व का व कशाकरता केली असेल ह्याबद्दल जिज्ञासा वा संशोधन करण्याची क्रिया कुठे भौतिक विज्ञानाच्या शास्त्रात Agenda वर आहे? ती जर विज्ञानात सापडत नसेल तर त्याचा शोध या भौतिक विज्ञानाच्या चौकटीबाहेर जाऊन करण्याचा प्रामाणिक Scientific Temper अभावाने किंवा पूर्वग्रहाने (Prejudice) भारलेला का आहे?

श्रद्धा ह्या शब्दाचा उगम हा ७०००-८००० वर्षांपूर्वी कमीत कमी व खरे सांगितल्यास विश्वप्रलय होण्यापूर्वी वेदिक समाजाच्या ज्ञानात झालेला आहे. ह्या श्रद्धा शब्दाचा अर्थ लावणे हे केवळ व्याकरणशास्त्राचे काम नाही तर आत्मज्ञान मिळवण्याचे जे वेदिक संस्कृतीचे प्रयत्न ह्या पृथ्वीवर मानवी समाजाने केले त्या काळात केलेल्या योगविद्येत आहेत. भगवद्गीतेत फक्त आपल्या काळाच्या जवळ व्यास ऋषी व इतर त्यांच्या सहकाऱ्यांनी नष्ट झालेल्या वेदिक समाजाच्या ज्ञानाचा त्या काळच्या प्रयत्नांचा परिणाम आहे.

त्यामुळे ह्या मर्त्य शरीरालाच सत्य मानणाऱ्या अज्ञानी विचारवंतांना स्वतःच्या अस्तित्वाचे सत्य नचिकेताच्या कठोपनिषद ह्यात वर्णन केलेल्या यमाने दिलेल्या उत्तरात 'आत्मा'-जीवात्मा, परमात्मा ह्या संकल्पनेत आहे. हे अमरतत्त्व आहे. ह्याचा पत्ता दिसत नाही!! आणि ह्या 'आत्मा' संकल्पनेचा सध्याच्या ज्ञानात पुन्हा एकदा पुनःस्मृतींत आणण्याच्या गतीच्या व इतर ग्रंथ व संहिता व संप्रदायांच्या प्रयत्नाचा परिणाम आहे. **ऋग्वेदाच्या पुरुषसूक्तात ह्या आत्म्याचा निर्मितीचा संदर्भ आहे तो 'अज' म्हणजे जन्म नसणारा असा** आहे.


तेव्हा लो. टिळक व महायोगी अरविंद यांनी गीतेतील १७ व्या अध्यत्मातील ३ ऱ्या श्लोकात शोधलेला गूढार्थ बीज श्रद्धा या संकल्पनेत आहे.

काय आहे हा शब्दार्थ व त्याने सूचित केलेल्या आत्मज्ञान व आत्मबोध होण्याच्या प्रयत्नाचे महत्त्व? हे फारच मोठे काम आहे!!

हा Individual Soul जीवात्मा हा 'श्रद्धा' ह्या चिजेने भरलेला आहे. This soul in Man is as it were made of 'Shraddah श्रद्धा, a faith विश्वास हा सत्यार्थ आहे. परम, चिरंतन सत्य म्हणजे Absolute Reality आहे.

आणि ह्याच ज्ञानाचा मानवाला त्याच्या आजच्या व भविष्यकाळच्या युगांत फार मोठा फायदा आहे. हा फायदा केवळ मानवसृष्टीलाच नव्हे तर सर्व वनस्पती, प्राणिजीवन व तथाकथित जड Matter लासुद्धा आहे.

म्हणूनच ह्याला महायोगी अरविंदांनी त्या आत्म्याला "Consciousness" ह्या विज्ञानशास्त्राने बहाल केलेल्या शब्दाचा आधार दिला आहे.





**काँशसनेसचे साहस**

हा आहे मानवी समाजाने इतर चैतन्यासमवेत चालवलेल्या भगीरथ प्रयत्नांचा संदर्भ. ह्या चळवळीचे, साधनेचा आधाराचे वर्णन 'Evolutionary Spiritual Science' म्हणजे 'उत्क्रांतीचे आध्यात्मिक शास्त्र' असा आहे. ही जी धडपड अथकपणे चालवली आहे त्याचा Road Map **'बृहदारण्यक उपनिषदात'** चितारला आहे.

तेव्हाच समजेल महायोगी अरविंदांच्या ध्येयवाक्याचा गूढ अर्थ. हे वाक्य आहे.

"Matter shall reveal the spirits face" - Sri Aurobindo




**जड वस्तूमध्ये सापडेल आत्म्याचा चेहरा**

**"जड वस्तूमध्ये सापडेल आत्म्याचा चेहरा" - श्री अरविंद**


ते पुढे म्हणतात :-

This is the decisive discovery of yoga - the crowning realisation that there is within us a source of immeasurable force, immeasurable intelligence, immeasurable joy for above the

possibility of weakness, above the possibility of ignorance, above the possibility of grief, which we can bring into touch with ourselves and under arduous, but not impossible contitions, habitually utilise or enjoy.

CWSA 13,16-17 Sri Aurobindo

" हा एक निश्चित निर्णायक शोध आहे, योगाचा - की, एक सर्वोच्च कळसात्मक साक्षात्कार की जो आपल्या अंतरंगात अपरिमित शक्तीचा स्रोत आहे, अपरिमित बुद्धी, अपरिमित आनंद आपल्या दुर्बलतेच्यावर, अज्ञानाच्या वर, दुःखाच्या पलीकडे, मी जी सर्व आपण




**कॉंशसनेसचे आध्यात्मिक क्षेत्र**

आपल्यासाठी आवाक्यात आणू शकू आणि कष्टाने; पण आपल्या मर्यादेच्या पलीकडे नव्हे व अशक्यही नव्हे, नेहेमीच्या वापरात आणू शकू व आनंदाने भोगू!!

हे जर मानवी अस्तित्वाचे आणि इतर तथाकथित 'अचेतन' व चेतन जिवांचे, वस्तूंचे **भविष्य** असेल तर त्याचा शोध व त्या अपरिमित शक्तींवर, ज्ञानावर, आनंदावर आपला अधिकार असेल तर तो **'श्रद्धा', अविचल श्रद्धा या शक्तीने प्राप्त होणार आहे.**

त्यामुळे ह्या 'Evolutionary Spiritual Science' ह्या संकल्पनेत फार मोठे उज्ज्वल भवितव्य ह्या मर्त्य "Human Existence" ला आहे, तसेच इतर सृष्टीला आहे.

ह्या श्रद्धेवर की जी आत्म्याचा Core Content असेल, त्याचा अंतर्भाग असेल तर त्यावर जन्मजन्मांतरीच्या जीवनचक्राच्या उज्ज्वल उत्क्रांतियज्ञात सामील व्हावयालाच हवे! ह्या विश्वासाला तडा देण्याचा हा विचारवंतांचा उपक्रम मानवविरोधी, चैतन्यविरोधी आहे. त्याचा धिक्कार करणे आवश्यक ठरेल!!

या Evolution क्रियेबद्दल ज्या योगक्रियेत अधिकारशून्य लाभ मिळवता येईल त्या योगाचे नाव **'Integral Yoga'** असे आहे. त्यावरील विचार पुढच्या काही अंकांतून दिशामध्ये करू या.

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाइल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr1@gmail.com.

●●●

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**०२२-२५४२ ६२७०**

# संस्कृत भाषेची समृद्धता, गेयता आणि काव्यमयता

*संस्कृत ही एक प्रभावी अशी भाषा आहे. गुंतागुंतीचे विषय तसेच भावभावनांचे वर्णन या भाषेत सहज मांडता येतात. याचीच प्रचीती या लेखातून येते. - संपादक*

## अतुलनीय काश्मीर

विजयते पुण्यबलैर्बलैर्यत्तु न शस्त्रिणाम् ।
परलोकात्ततो भीतिर्यस्मिन्निवसतां परम् ॥
असन्तापार्हतां जानन् यत्र पित्रा विनिर्मिते ।
गौरवादिव तिग्मांशुर्धत्ते ग्रीष्मेप्यतीव्रताम् ॥
विद्यावेश्मानिह्नतुङ्गानि कुङ्कुमं सहिमं पयः ।
द्राक्षेति यत्र सामान्यमस्ति त्रिदिवदुर्लभम् ॥

**कवी - कल्हण, राजतरंगिणी तरंग १.**
**श्लोक क्र. - ३९, ४१, ४२.**

अनुवाद - स्पष्टीकरण - येथे कल्हण काश्मीरच्या असामान्यत्वाची माहिती देत आहे. कवी म्हणतो, ही भूमी पुण्याच्या बळावरच जिंकता येईल, शस्त्रांच्या नव्हे. कवीचे हे बोल इ.स. ११४८ मधले आहेत. इ.स. ७१२ च्या बिन कासीमच्या आक्रमणापासून कवीच्या काळापर्यंत म्लेंच्छ काश्मीरचे काहीही वाकडे करू शकले नव्हते. भारतात अनेक ठिकाणी टोळधाडींनी नुकसान केले. गझनी ह्व घोरीचे लुटारू उत्तर भारतात उच्छाद मांडत होते. पण काश्मीरच्या राजांनी त्यांना काश्मिरात शिरूच दिले नाही. उलट पळवून लावले. त्यामुळे कल्हणाचे उद्‌गार त्या वेळी अतिशयोक्तीहि रहातच होते. काश्मिरातला उन्हाळा सुखकर असतो, उन्हाचा त्रास होत नाही. याचे कारण कवीच्या प्रतिभेला स्फुरते ते असे की कश्यपाचा पुत्र सूर्य वडिलांनी निर्मिलेल्या काश्मीरभूमीला तप्त कशी करणार बरे ! वडिलांविषयी आदरापोटी तो तिला ऐन ग्रीष्मातही तापवत नाही, अशी 'उत्प्रेक्षा' योजली आहे. काश्मीरची विद्‌वत्परंपरा, रंग आणि सुगंधाचे उत्कृष्ट मिश्रण असलेले केशर, सदासर्वकाळ थंडगार पाणी, अवीट मधुर द्राक्षे यांमुळे ते स्वर्गावरही विजय मिळवणारे वाटणे सार्थच आहे. येथे कवीचा जन्मभूविषयीचा सार्थ अभिमान जाणवतो.

## काश्मीरराज 'गोनंद' पहिला

काश्मीरेन्द्रः स गोनन्दो वेल्लद्‌गङ्गदुकूलया ।
दिशा कैलासहासिन्या प्रतापी पर्युपास्यत ॥
साहायकार्थमाहूतो जरासन्धेन बन्धुना ।
संरुरोध कंसारेर्मथुरां पृथुभिर्बलैः ॥
तेनोपकूलं कालिन्द्याः स्कन्धावारं निबन्धता ।
यादवीहसितैः सार्धं योधानां मीलितं यशः ॥

**कवी - कल्हण, राजतरंगिणी तरंग १.**
**श्लोक ५७, ५९,६०**

अनुवाद - स्पष्टीकरण - चंचल गंगारूपी दुकूलाने कैलास पर्वताला हसणाऱ्या (उत्तर) दिशकडून तो पराक्रमी काश्मीरराज गोनंद १ ला पूजिला जात होता. जरासंध नामक बांधवाने मदतीसाठी बोलविलेल्या त्याने प्रचंड सेनेद्‌वारे कंसनाशन कृष्णाच्या मथुरेला वेढा दिला. यमुनेच्या तीराजवळ सेनातळ उभारणाऱ्या त्याने यदुकुळातील स्त्रियांच्या हास्यांसह योद्‌ध्यांची किर्ती नष्ट केली.

वर उल्लेखलेला 'गोनंद' हा महाभारतकाळातला काश्मीरचा पहिला ज्ञात राजा होय. कवी त्याचा गौरव करताना उत्तर दिशाच त्याची सेवा करीत असलयाचे म्हणत आहे. उत्तर दिशेचे वर्णन करताना ती गंगारूपी

वस्त्र नेसणारी आणि कैलास पर्वताला आपल्या शुभ्रतेने हरवणारी म्हटले आहे. येथे 'रूपक' आणि 'उत्प्रेक्षामूल अतिशयोक्ति' अलंकार आहे. यादवांचा शत्रू जरासंघ गोनंदाचा निकटवर्ती असल्याचे येथे 'बंधु' शब्दांतून सूचित होते. त्याच्या बोलावण्यावरुन गोनंद मदतीसाठी मथुरेला गेला आणि विशाल सेनेद्वारे यादवांच्या राजधानीला त्याने वेढा घातला. यमुनेच्या काठी तळ ठोकूनच त्याने शत्रूच्या मनात धडकी भरवली. यादवांच्या सुंदरींचे हास्य मालवले या वाक्यातून हे सूचित होते. तसेच लढाईतही पराक्रमी, अजेय वगैरे कीर्ती असणाऱ्या यदुकुळातील वीरांचा वारंवार पराभव केला. अर्थातच त्यांची कीर्ती झाकोळली गेली. येथे यादवींचे हास्य आणि यादवांची कीर्ती परस्परांसह नष्ट केली, असे म्हणत 'सहोक्ति' अलंकार वापरला आहे.

### अविश्वसनीय मूर्ती

तोलकानां सहस्राणि चतुर्भिरधिकानि सः ।
अशीतिं निदधे हेम्नो मुक्ताकेशवविग्रहे ॥
तावन्त्येव सहस्राणि पलानां रजतस्य च ।
संधाय शुद्धधीरचक्रे श्रीपरीहासकेशवम् ॥
रीतिप्रस्यसहस्रैस्तु तेन तावद्भिरेव सः ।
व्योमव्यापिवपुः श्रीमान् बृहद्बुद्धो व्यधीयत ।।

**कवी - कल्हण, राजतरंगिणी तरंग ४.**
**श्लोक २०१, २०२, २०३**

अनुवाद - स्पष्टीकरण - दिग्विजयानंतर राजा लतलितादित्याने अनेक मंदिरे बांधली. दाने केली. येथे त्यातील सर्वोत्कृष्ट ३ मूर्तींविषयी माहिती आहे. त्याने मुक्ताकेशव ही विष्णूची ८४,००० तोळे सोन्याची मूर्ती करवून घेतली. त्यानंतर ८४,००० पळे वजनाच्या चांदीची परीहासकेशव नामक विष्णूची मूर्ती स्थापली, तसेच ८४,००० प्रस्थ म्हणजे शेर काश्याची बुद्धमूर्ती स्थापली. विशाल बुद्धमूर्ती आकाशव्यापी भासत असे. कल्हण पुराव्याशिवाय लिहीत नाही हे सर्वमान्य आहे. भारत खरोखर किती समृद्ध होता, हे जाणवते. उगाच नाही या देशावर गेल्या २५०० वर्षांत एकामागून एक एवढी आक्रमणे झाली. दुःख याचे वाटते की, आज आम्हांला आपल्या गतवैभवाची काहीही तमा नाही. आपल्याला त्याविषयी फारशी बोच नाही. कारण इतिहासच मुळी तशा तऱ्हेने शिकवला जातो. हे ज्या काश्मीरचे वर्णन आहे, तेथेच मुळी आज आपल्याला जिवाच्या भयाने वावरावे लागते, याहून दुर्दैव काय असावे! प्राचीन हिंदू राजांचे हे वैशिष्टय की जुलमी, अत्याचारी राजांपेक्षा उदार, दानी, धर्माचरणी राजांची संख्या जास्त आहे. हेही आम्हांला माहीत नसते. वरील मूर्तींच्या वर्णनातून भारताचे 'सोने की चिडिया' हे वर्णन किती सार्थ होते ते लक्षात येते.

### रहाट

पिशाचैः खनयामास तत्सेकार्थाय दीर्घिकाः ।
जलयन्त्राणि चित्राणि ताखु चक्रेतिकोविदः ॥
चक्री न विष्णुर्वृषभोह्यमानो हरो न माली विषयाहितो न ।
भ्रमन्न वायुर्जलदो न मेघो वनस्पतिप्राणनकृन्न सोमः ॥
यस्य पुंनाम लोकस्मिन् रहट्ट इति विश्रुतम् ।
कालचक्रस्य दृष्टान्तः कवयो यं प्रचक्षते ॥

**कवी - विश्वनाथ पित्रे, व्याडेश्वरोदयमहाकाय**
**सर्ग १३ - श्लोक १५, १७, १८**

अनुवाद - स्पष्टीकरण - (श्रीधराने) त्या वृक्षवल्लीच्या सिंचनासाठी पिशाचांद्वारा विहिरी खणल्या. महापंडित श्रीधराने त्यांच्यात आश्चर्यकारक जलयंत्रे बसवली. चक्रधारण करणारा आहे; परंतु विष्णू नाही. वृषभाकडून वाहून नेला जातो (चालवला जातो); परंतु शंकर नाही. माळी असणारा; परंतु राजा नव्हे, सतत फिरणारा आहे; परंतु वाटा नव्हे. पाणी देणारा आहे, परंतु ढग नाही. वनस्पतींना चैतन्य देणारा आहे; पण चंद्र नव्हे. (ही प्रहेलिका म्हणजे कोडे आहे.) या जगात त्याचे रहाट हे पुल्लिंगी नाव प्रसिद्ध आहे, ज्याला कवी 'कालचक्राचा दृष्टान्त' म्हणतात. येथे श्रीधराने केलेल्या पाण्याच्या सोयीचे वर्णन आले आहे. वृक्षवेलींना सिंचन करण्यासाठी

त्याने अनेक विहिरी खणल्या आणि त्यांवर यंत्रे बसवली. या प्रहेलिकेत 'श्लेष' अलंकार साधला आहे. चक्रयुक्त, बैलांकडून चालवला जाणारा, माळ धारण करणारा, फिरणारा, पाणी देणारा आणि वनस्पतींना संजीवक ठरणारा रहाट हे तिचे उत्तर आहे. कवी सदैव परिवर्तनशील काळाचा दृष्टान्त असे रहाटाला संबोधतात येथे 'दृष्टान्त' हा सादृश्यदर्शक शब्द वापरलयाने येथे 'उपमा' अलंकार होतो. 'विषयाहितः' हा शब्द क्लिष्ट असून त्याचा अर्थ मो. दि. पराडकरांनी 'राजा' असाच केला आहे.

**मधुरवाणीचे माहात्म्य**

धत्ते श्रियं सृजति कीर्तिमघं लुनीते ।
मित्रत्वमानयति हन्त विरोधिनोपि ।
यात्यध्वभिः प्रतिपदं सुमनोनुकलेर्गौः
कामध्धुकमिव नापहरत्यनर्थम! ॥

**कवी - कल्हण, राजतरंगिणी तरंग ७. श्लोक ७८९**

अनुवाद - स्पष्टीकरण - लक्ष्मी देते कीर्ती प्रसवते, पाप नष्ट करते, अहो शत्रूंनाही मित्रत्वाला आणते, सज्जनांना अनुकूल असणाऱ्या मार्गांनीच पदोपदी जाते, कामधेनुस्वरूप वाणी कोणता बरे अनर्थ टाळत नाही?

येथे कवीने गोड वाणीचे वर्णन केले आहे. या गोड वाणीमुळे माणसाला धन मिळते. गोड बोलणाऱ्याची सारे स्तुती करतात आणि त्याचा लौकिक दूरवर पसरतो. मधुरवाणी पाप नष्ट करते. गोड बोलण्यामुळे दुसऱ्याच्या मनाला होणारी वेदना टळते आणि अर्थातच आपल्या नावे जमा होणारे पाप कमी होते. शत्रूलाही गोड वाणीमुळे मित्र करून घेता येते. शिवाय ही मधुरवाणी सज्जनांच्या अनुकूलतेच्या मार्गाने जाते म्हणजे सज्जनांशी आपला कधी संघर्ष होतच नाही. एवढे सारे लाभ करून दिल्यावर अनर्थ उद्भवणार कोठे? म्हणून कवी म्हणतो की, ती सारेच अनर्थ टाळते. येथे एकटी वाणी काय काय साध्य करते ते अनेक क्रियांच्या रूपात सांगून कारकदीपक साधला आहे. कामधुक् गौः या क्लिष्ट शब्दरचनेमुळे वाणीची कामधेनूशी तुलना सूचित होते.

**शहाण्यांची फसगत**

विश्वासोज्झितधीः शिशून् कलयते
काकोन्यदीयान् निजान् ।
हंसः क्षीरपयोविभागकुशलः
त्रस्थत्थसाराद्धनात् ॥
लोकावेक्षणतीक्ष्णधीः खलगिरं जानाति सात्यां नृपो ।
धिग्दैवदंगधाविमुग्छताव्यतिकरस्पृष्टं विधानं विधेः ॥

**कवी - कल्हण, राजतरंगिणी तरंग ६ श्लोक २७५**

अनुवाद - स्पष्टीकरण - कोणावरही विश्वास न ठेवण्याची बुद्धी असलेला कावळा इतरांची पिल्ले (कोकिळेची) आपली मानतो. दूध आणि पाणी वेगळे करण्यात निपुण राजहंस निःसार ढगाला भितो. जगताच्या निरीक्षणामुळे तल्लख बुद्धी असणारा राजा दुर्जनाचे बोल खरे मानतो. धिक्कार आहे ब्रह्मदेवाच्या पांडित्य आणि मूर्खत्व यांच्या मिश्रणाने युक्त अशा निर्मितीचा.

गोड गोड बोलून राजे व शासनकर्ते यांना वश करून घेणारे लोक सर्वत्र असतात आणि तरीही राजे, महाराजे अशा लोकांच्या कह्यात जातात. यामुळे उद्विग्न होऊन कवीने वरील श्लोक रचला आहे. कोणावरही विश्वास न ठेवतारा धूर्त कावळा कोकिळेच्या पिल्लांना आपली म्हणून वाढवतो. कोकिळा आपली अंडी कावळयाच्या घरट्यात घालते हे प्रसिद्ध आहे. मग पिल्ले ओळखण्यात कावळयाची चलाखी का मार खाते? नीर-क्षीर विवेकी हंस केवळ पाण्याने बनलेल्या ढगाला घाबरतो. पावसाळ्याच्या आरंभीचा हंस मानस सरोवराकडे पळ काढतात आणि परततात ते थेट शरदातच. म्हणून हंस ढगाला भितो असे येथे म्हटले आहे. शहाणा राजा दुर्जनांच्या गोड गोड वाणीला, खोटया स्तुतीला भुलतो. कावळा, राजा आणि हंस हे एरवी शहाणे नाहीत का? पण त्यांच्या वागण्यात असा मूर्खपणा का आढळावा? या

विचाराने कवीने शहाणपणा आणि मूर्खपणा असणाऱ्या ब्रह्मदेवाच्या सृष्टिनिर्मितीलाच बोल लावले आहेत. वाच्यार्थाने ब्रह्मदेवाच्या निर्मितीची निंदा केली असली तरी खरी त्यातून शहाणे असून फसगत होणाऱ्यांचीच निंदा अभिप्रेत आहे म्हणून येथे 'व्याजनिंदा' अलंकार आहे. तसेच येथे कावळा, हंस आणि राजा यांची तुलनाही झाली आहे, तेथे 'निदर्शना' अलंकार आहे.

या ६ ही श्लोकांतून संस्कृत भाषेची समृद्धता, गेयता, काव्यमयता प्रतीत होते. एक श्लोक भारताच्या नंदनवनाचे ह्र काश्मीरचे वर्णन - करतो तर दुसरा श्लोक काश्मीरच्या शूरवीर राजाचे गुणवर्णन करतो. पुढचे श्लोक भारतातील लक्ष्मी आणि विद्येची, बुद्धीची श्रीमंती दर्शवतात. यांनी वाचकांचे रंजन तर होतेच आणि ज्ञानवृद्धीसुद्धा होते. यासाठी दै. लोकसत्ता यातील 'नवनीत ह्र देववाणीचे उपासक' हे सदर संदर्भासाठी आहे. श्रीगजानन श्री. वैदय यांनी यांसारखे अनेक वैशिष्ट्यपूर्ण श्लोक संकलित केले आहेत. त्यांतले हे निवडक आहेत.

संस्कृत विभाग
**रेवती मिलिंद कुलकर्णी**
द्वितीय वर्ष / कला

●●●

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षीत करीत आहोत.**

**- संपादक**

**(सगुण-निर्गुण...पृष्ठ क्र.५ वरून)**

मार्गदर्शन, पण मनापासून उन्हापावसाची पर्वा न करता चित्र काढतात तेच मला खरेखुरे देवासारखे वाटले!

अजिंठा-वेरूळ, कार्ले-भाजे येथे साकारलेल्या चित्र-शिल्पांची आठवण झाली; चित्र - शिल्पकार आज अज्ञात राहिलेत, पण कला मागे ठेवून गेलेत. आज ती चित्र-शिल्पे अजरामर व जगप्रसिद्ध झालेली आहेत. आज कोणत्याही आर्ट गॅलरीत शिरले तर तेथील 'चित्र - शिल्पा' पेक्षा, कलावंतांच्या अहं, अहंकारीपणाचा 'दर्प' मन उदासून टाकतो. प्रत्येक पेंटिंगखाली सही-स्वाक्षरी केलीच पाहिजे असा आग्रह त्यातून सूचित होत असतो. एकीकडे निर्गुणाची पूजा मांडायची, त्याचा उदोउदो करायचा तर दुसरीकडे 'सगुणाची' उपेक्षा - अवहेलना करायची! शेवटी नाइलाजाला इलाज नसतो - असेच ना!

'सूर्य' असेपर्यंत तो उगवतच राहणार; पण तो उगवताना गाजावाजा करीत उगवत नसतो व मावळतानासुद्धा किरकिरत जात नसतो!

**परमानंद मनोहर शेलार**
१०८, पहिला-मजला,
त्रिवेणी संगम सो., सह्याद्री सो. समोर
आय.सी.आय.सी.आय. बँकेलगत,
मुंबई-पुणे महामार्ग,
कळवा (प.) - ४००६०५
ठाणे

●●●

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ९**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस ३० वा : कुकुरवाडा-शुक्लेश्वर तीर्थ मुक्काम - राममंदिर , २० कि.मी.**

काल झोपायला खाली होती तरी थंडी वाजली. त्यातून मी स्लीपिंग बॅग वापरली नाही तर सतरंजी आणि ब्लँकेट वापरले. सकाळी निघायला ८ वाजले कारण सिद्धेश्वर महादेव मंदिरातील पूजा - आरती झाल्याशिवाय निघता आले नाही व त्याशिवाय चहाही मिळणार नव्हता. निघालो तेव्हाही खूप थंडी होती. या एक - दोन दिवसांतच थंडीचे प्रमाण वाढले आहे.

वाटेने जाताना कुणी चहा देते, कुणी न्याहारीचे पैसे घेत नाही तर कुणी गाडी थांबवून पैसे देऊ करतात. अशा वेळी आम्ही फक्त एक रुपयाची मागणी करतो. सुटे नसतील तर दहाची नोट घेतो व सांगतो की अमरकंटकला गेल्यावर आम्ही मैय्याला या साऱ्या दानशूरांना, भक्तांना आशीर्वाद दे असे सांगू आणि हेही सांगतो की हे पैसे सत्कार्यात जातील, आम्ही वापरणार नाही.

कुणी चहा न्याहारी, भोजन छास असे काही विनाशुल्क दिले तर 'सर्वेत्र सुखिनः सन्तु'.. हा श्लोक म्हणतो तुम्ही तुमचा परिवार सुखी व प्रसन्न राहो, एकजूट राहो व तुमचा उत्कर्ष होत राहो.

सुरुवातीला मी लिहिताना अशा प्रसंगांचा उल्लेख करत होतो. परंतु आता मात्र यातली नवलाई जाऊन ही एक नित्य घडणारी गोष्ट म्हणून उल्लेख करणे सोडून दिले आहे.

कुकुरवाडा आश्रम सोडला आणि २/४ किलोमीटरपासून भरूच (भडोच) शहराची वस्ती सुरू झाली. ठाण्यातील अशोक टॉकीज ते जांभळी नाका येथे फिरताना जो अनुभव ३०/३५ वर्षांपूर्वी येई तोच अनुभव आज आला.

भरुचमध्ये हिंदू - मुस्लीम वस्ती ५०% असू शकेल परंतु धार्मिक/सामाजिक तेढे मात्र नाही असे कळले. त्यातून नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत मोदींचा पक्ष पूर्वीपेक्षा अधिक मतांनी/जागांनी निवडून आला याचा अर्थ लोकांना चांगला माणूस कळतो, आपला विकासही कळतो.

स्टेशन चौकापासून मात्र गिचमिड वस्ती कमी होऊन सधन घरे दिसू लागली.

रविवारी HDFC च्या ATM मधून मी पैसे काढण्याचा प्रयत्न केला, पण व्यवहार झाला नव्हता. आज मात्र राष्ट्रीय बँकेला ATM मधून मला पैसे मिळाले.

आश्रम, मंदिर, घर, कुठही आम्ही राहिलो, जेवलो की कृतज्ञता म्हणून काही पैसे तिथे ठेवतो त्यामुळे पैसे लागतात.

आजही एका धाबावजा हॉटेलात दुपारी जेवलो.

आज भडोचनंतर शुक्लतीर्थाकडे जाताना मोठ्या रस्त्यावर झाडे कमी होती, परंतु नंतर मात्र डोक्यावर सतत सावली होती, वारा होता, हवा थंड होती त्यामुळे आजचे मार्गक्रमण ही शिक्षा न वाटता खरी आनंदयात्रा वाटली.

भडोच शहरामुळे नसलेली शेती या रुस्त्याला दुतर्फा दिसायला लागली. बाजरी, ऊस, कापूस, एरंड, मोहरी आणि बरेच काही. रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे मात्र

खूप जुनी, मोठी आणि डेरेदार होती. चिंच, वड, पिंपळ, उंबर (पण कमी), कडुनिंब. वडाच्या पारंब्या तोडून टाकल्याने ते भुंडे दिसत होते. बरेच दिवस नाहीशी झालेली रुई व टणटणी पुन्हा दिसली. पारवे, होले दिसले.

रस्त्यामुळे मैय्या दिसत नाही, पण उजवीकडे तिची उपस्थिती जाणवत होती. कारण काही ठिकाणी नदीच्या खोऱ्याची उतार, टेकडी, घळ, नाले की वैशिष्ठ्ये दिसत होती.

रस्त्यावर कडेला वाळू / कच दिसते, पण जमीन मात्र वालुकामय नाही तर घट्ट ढेकळांची, काळी माती असलेली, महाराष्ट्रातील जमिनीसारखी आहे.

संध्याकाळी ६ वाजता शुक्लतीर्थावर पोहोचलो.

**दिवस ३१ वा : शुकुतीर्थ : देलवाडा १७ कि.मी.**

मुक्काम : कर्कटेश्वर महादेव मंदिर - समोरची आश्रमवजा मोठ्ठी खोली.

रोज रात्री/संध्याकाळी स्नान होते, पाठोपाठ कपडे धुतले जातात. सकाळपर्यंत आता ते कपडे वाळतात, तेच विशेषतः लुंगी (केशरी) आणि बिनबाह्यांचा गंजीफ्रॉक पुन्हा वापरता येतात. पांढरी लुंगी वा बाह्यांचा गंजीफ्रॉक रात्री झोपण्यापुरता.

सकाळी उशिरा उजाडते, चहा घेऊन निघेपर्यंत ७.४५ झाले. आज सकाळी ५ वाजता न उठता जवळजवळ सहा वाजता उठलो होतो.

रस्ता सुंदर, दोन्हीं बाजूच्या झाडांनी डोक्यावर कमान धरलेली त्यामुळे मांडवाखालून जातोय असे वाटत होते. झाडांवरून कसलेसे वेल (आता वाळून गेलेले) खाली उतरलेले. बरीच झाडे वडाची असावीत कारण पारंब्या होत्या. परंतु पानांचा आकार थोडा लहान, वेगळी (लांबट) होता आणि पान फारसे जाड वाटले नाही. भेटले की बेंडखळे सरांना विचारले पाहिजे.

मध्यंतरी रस्त्याच्या कडेला सातत्याने ‘सब्जा’ ची झुडपे पाहिली होती तर गेले दोन दिवस दुतर्फा टाकळ्याची सुकलेली झाडे दिसत आहेत. झाडे वाळून गेली असली तरी शेंगांमुळे टाकळा ओळखता येतो.

सातत्याने शेते दिसतात, पण वस्ती मात्र जवळपास नसते. त्यामुळे ३-३, ५-५ किलोमीटर कधीकधी काही दिसत नाही शेतांशिवाय, मग चहापाणी तर दूरच.

आज रस्त्याला जाणारी वर्दळ बरीच दिसली. पांढरे ध्वज घेऊन जाताना अधेमधे काही गट दिसले. नंतर कळले की उद्या आहे दत्तजयंती, त्यामुळे ३० किमीवरील नारेश्वराकडे ही मंडळी चालली आहेत.

मध्यप्रदेशातील परिक्रमावासी मोठ्या संख्येने असतात कारण परिक्रमा एकदातरी करायचीच असा संकल्प मध्यप्रदेशातील प्रत्येक कुटुंबाचा असतो. ही माहिती श्री लोकेशानंदजींनी आम्हांला दिली. गुजराती २ ते ५ सुद्धा या परिक्रमेत नसतात /असतात.

नर्मदा परिक्रमेतील प्रत्येक तीर्थाला भेट द्यायचीच असा हेतू परिक्रमावासींचा असतो. त्यामुळे पैदल सरू केलेल्या परिक्रमेत नंतर बस, रिक्षा याने प्रवास केला जातो व काही अंतर चालून नंतर पुन्हा साधनाने प्रवास असे चित्र दिसते.

तीर्थस्थाने दर्शन आणि पापक्षालन + पुण्यसंचय असा तिहेरी हेतू या साध्याभोळ्या परिक्रमावासीयांचा असतो. वैशिष्टच म्हणजे जवळपास हे सर्व जण अनवाणी चालतात.

दहा किलोमीटर चालल्यानंतर जनोर गाव आले. साडेअकरा वाजून गेले होते. काल रात्री भोजन मिळाले नव्हते. बिस्किटे खाऊन खाऊन कंटाळा येतो. रात्री शेंगदाणे खाल्ले, भावनगरी खाल्ली तरीही भाताची भूक मिटली नव्हती. आज तरी भोजन मिळो अशी विनवणी मी मैय्याला

करत होतो. विनंती करण्याचे कारण म्हणजे आतापर्यंत चहासुद्धा रस्त्यावर दिसला नव्हता. पैसे असूनही भोजनाची विकत सोय उपलब्ध नसेल, तर करणार काय!

कुणीतरी दिले तरच भोजन! जनोर गाव आले. सौ. मंगलने समोरच्या घरात विचारले आणि होकार मिळाला. आम्ही त्याच घरात स्नान आटोपले व भोजन केले. यांचे नाव माछी.

नारोशंकराला जाण्यासाठी आतून मैय्याकिनाऱ्याला समांतर वाट होती ज्यामुळे दहा किलोमीटर चाल वाचणार होती. ती वाट दाखविण्यासाठी माछींनी मुकेश या त्यांच्या मुलाला गाडीसह पाठविले. तो पुढे जाऊन थांबे व आम्ही पोहोचलो की पुन्हा पुढल्या फाट्यावर जाऊन थांबे. जवळपास अर्धा-एक किमी. मार्ग दाखवून योग्य रस्त्यावर आम्हांला लावून नंतर तो परतला. इथे येईपर्यंत आम्हांला शेतांभोवती बाजलेल्या रस्त्याशेजारील उंच झाडीमध्ये जास्वंदाची अनेक झाडे दिसली. घरच्या कुंपणाला जास्वंद आम्ही पाहिला आहे. पण रस्त्याच्या कडेला इतक्या प्रमाणात आज पाहिला. शेवग्याची असंख्य लेकुरवाळी झाडे पाहिली आणि धन्य वाटले.

गावाकडे जायचा रस्ता म्हणजे मला आमच्या गिरिभ्रमणाची, सह्यभ्रमणाची आठवण झाली. एका ठिकाणी आम्ही चुकलो आणि दूर माळावरून आवाज आला आणि मागे फिरून योग्य मार्गाने पुढे निघालो. तिथे थांबलेल्या माणसाने बरोबर येऊन एक उपनदी पार करण्याच्या खुणेपर्यंत आणले व आम्ही नदीपार होईपर्यंत तो तिथेच जंगलात थांबला होता (नांदगाव).

आज तो माणूस भेटला नसता तर आम्ही चुकीच्या पहिल्या रस्त्याला भरकटलो असतो आणि बरोबर आलो असतो तरी नदी आल्यावर ती ओलांडून पलीकडून रस्ता जातो हे आम्हांला कळलेच नसते व आम्ही या काठावरच फिरत राहिलो असतो.



कडा चढून वर आल्यावर शेते लागली. कापूस वेचणाऱ्या महिलांनी हाक मारून थांबविले, पाणी दिले व विश्रांती घेण्यास सांगितले. त्यांच्या या प्रेमाने आम्ही फार भारावून गेलो.

पुढे सोमज गावात चहा विचारला तर नकार मिळाला म्हणून ती सीमा ओलांडून पुढे आलो व एका साध्या गरीब महिलेला विचारले तर तिने होकार दिला. चहा पिताना, तिथे हजर झालेल्या जसवंतसिंग या माणसाने विचारपूस केली वकर्कटेश्वर मंदिरात सर्व सोय होईल म्हणून याच गावात थांबण्याची विनंती केली (देलवाडा).



जसवंतसिंह हे साधक असून टेम्बेस्वामी-रंगावधूत यांचे उपासक /शिष्य. या साधकाने विवाह केलेला नाही. उपासनेसाठी स्वतंत्र खोली माळ्यावर तयार करून ईशान्य कोपऱ्यात येईल अशी रचना आहे. दर्भाचे आसन स्वतः तयार केले आहे. सतरंजी मापाचे दर्भासन / दर्भाशयन त्यास स्वतः तयार करावयाचे आहे.

शरीराला आकार देणारा कुंभार म्हणजे व्यायाम.

रात्री जसवंतसिंगाच्या मामांकडे, गणपतींकडे भोजन झाले. रात्री मंदिरात तरुण मुलांचा एक गट रोज हनुमान चालिसा, रामधून तालासुरात सवाद्य म्हणतो. फारच छान!

**दिवस ३२ वा : देलवाडा -कोठिया (२२ किमी.)**

देलवाड्यातला अनुभव फारच भाववाही होता. सकाळी ६.४५ ते संध्याकाळी ६.००

दत्तजयंती : नाटेश्वरला ११ वाजता पोहोचलो. दर्शन घेऊन ३/४ किमी रस्ता सडकेने पार केल्यावर कोया गावातून नदीकिनारी आलो ते पुढील मार्गक्रमण शक्यतो किनाऱ्यावरून करण्यासाठी. मैय्याचे दर्शन झाल्या झाल्या भावना उचंबळून आल्या. महामार्गाने / सडकेने, विशेषतः नदीपासून दृष्टिआड रस्ता निवडणे म्हणजे केवळ पायपीट आहे. किनाऱ्यालगत राहून केलेली परिक्रमा खरी आनंददायी परिक्रमा आहे. नदीवरील स्नानाचा आनंद!

नदीवर स्नान करून किनाऱ्याने चालत दहिरोवी गावाजवळ कडा चढून गावात आलो व तिथून गाडीरस्त्याने / पायवाटेने कोठिया गाव गाठवे. किनाऱ्याहून जाताना बऱ्याच वेळा बाभळीच्या छोट्या/ इवल्या रोपांमुळे चांगलेच काटे लागत जातात. पायवाट काही ठिकाणी विशेषतः फतेपूरला आम्ही वर न चढता प्रवाहाशेजारून चालणे स्वीकारणे तेव्हां डावीकडे उंच भिंत किंवा फार अरुंद जागा, तीही बाभळींनी व्यापलेली, उजवीकडे सरकायला जागाच नाही कारण लगेच खोल पात्र व पायवाट अगदी कडेवरून जाणारी. इतकी की जागरूक राहिलो नाही तर पाण्यात पडू.

देलवाडा गावातून छान घाट होता; परंतु मध्यंतरी आलेल्या पुराने तो नाहीसा झाला व नदीकडून उंच कडा, निसरड्या मातीवरून, उभा चढ चढून गावात येणे कसोटीचे ठरले. माकडे मात्र आपल्यातच मग्न आणि फटाफट उड्या मारत या चढावरून सहज आडवी पार होत होती. जो चढ आम्ही जपून जपून चढत होतो त्यावरून लीलया उड्या मारत माकडे जणू आम्हांला हिणवत होती.

मैय्याकिनारी जे पेराल ते उगवते. तुरीच्या फुलांनी आणि शेंगांनी राने भरली होती. हिरव्या मिरच्या पोत्याच्या पोत्यांनी वजन होत होत्या. मिरच्यांचे ताजेपण दृष्ट लागेल असे होते. साधारण ४० किलोचे एक पोते. ही पोती इथून सुरतेला जाऊन मुंबईला जातात. २० किलोला २०० रु. हा चढा भाव तर २० किलोला ८० रु. हा पडेल भाव. आता पडेल भावात मिरची जातेय.

रमेशभाई ईश्वरभाई पटेल या सद्गृहस्थाने आम्हांला घरात भोजन दिले व ओसरीवर झोपण्यास अनुज्ञा दिली. या गावात १०-१२ वर्षांपासून स्वाध्याय आहे. रात्री मैय्यापूजनाला पतिपत्नी दोघेही हजर होते.

दुपारी नदीवर स्नान केले तेव्हा एक १५-२० वर्षांचा मुलगा घाटाच्या कठ्यावर पडून होता. त्याच्या पावलाला फडके बांधले होते. पायाला इन्फेक्शन होऊन ते विकोपाला गेले असावे. डॉक्टरांकडे त्याला नेणार कोण? रणजित नावाच्या या मुलाला आईवडील नाहीत. त्याला असेच कुणीतरी सांभाळले, वाढविले. आता मैय्याच्या विश्वासावर तो घाटावर पडून असतो. अशोकने त्याला काही घरगुती औषधे सांगितली. शिवाय सरकारी दवाखान्यात जायचा सल्ला दिला आणि सत्कार्यासाठी जमलेल्या निधीतून अल्पशी रक्कम त्याला दिली. मुलाचे डोळे पाण्याने भरले. त्याच्या डोक्यावरून हात फिरवत त्याला धीर दिला. त्याचे अश्रू पाहून मला गलबलले. माणूस भावाचा भुकेला आहे. तो भाव मिळाला की त्याला जे मिळते ते त्याच्या नजरेतून व्यक्त होते. हे अश्रू वेदनेचे नव्हते, गरिबीचे नव्हते तर ते होते भावाश्रू!

क्रमशः

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

# भारतावर प्रेम करणारा साहेब - जिम कॉर्बेट

*वन्यजीव संरक्षणासाठी धडपडणाऱ्या जिम कॉर्बेट या अवलियाची माहिती या लेखातून आपल्याला मिळते. - संपादक*

इ.स. १६०० मध्ये इंग्लंडच्या राणीने ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या व्यापाऱ्यांना पूर्वेकडील देशांसोबत व्यापार करण्याची सनद दिली. त्यानंतर या व्यापारी कंपनीचे व्यापारी जगातील विविध देशांमध्ये व्यापारउदिमासाठी जाऊ लागले. हे व्यापारी १७ व्या शतकात भारतातील पश्चिम किनाऱ्यावर आले व त्यांनी वखारी स्थापन करण्यास सुरुवात केली. कालांतराने ते भारताच्या पूर्व किनाऱ्यावरदेखील गेले व विविध ठिकाणी वखारी स्थापन करू लागले. सुरुवातीस ह्या व्यापाऱ्यांना भारतीयांसोबत व्यापार करण्यात रस होता. परंतु ते भारतातील राजकीय परिस्थितीही बारकाईने निरीक्षण करत होते. १८ व्या शतकात भारतात अनेक राज्ये व संस्थाने होती व त्या संस्थानांवर विविध राजे आणि नवाब राज्य करीत होते. हे राजे अनेकदा आपसांत लढत असत. या अंतर्गत राजकीय अनागोंदीचा ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीने फायदा घेतला व १७५७ साली बंगालचा तत्कालीन नवाब सिराज उद्दौलाच्या सैन्याचा प्लासीच्या लढाईत पराभव केला. प्लासीच्या लढाईपासून ब्रिटिशांनी खऱ्या अर्थाने भारतावर राजकीय नियंत्रण प्रस्थापित करण्यास सुरुवात केली. सर्वात प्रथम ब्रिटीशांनी भारतात बंगाल प्रांत काबीज केला व त्यानंतर इतर अनेक राज्ये व संस्थानं काबीज करण्याचा सपाटा लावला.

इ.स.१७५७ ते १८५७ या शंभर वर्षांच्या कालावधीत प्रामुख्याने लॉर्ड कॉर्नवॉलिस, लॉर्ड वेलस्ली व लॉर्ड डलहौसी या बिटिश गव्हर्नर जनरल्सनी अनुक्रमे लढाया व युद्धे, तैनाती फौज पद्धती व दत्तक वारसा नामंजूर या धोरणांचा वापर करून भारतात ब्रिटिशांचे साम्राज्य वाढविण्यास मदत केली. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या साम्राज्यविस्ताराच्या धोरणाविरुद्ध सन १८५७ मध्ये भारतीयांनी उठाव केला. हा उठाव आधुनिक भारताच्या इतिहासात १८५७ चा उठाव म्हणून प्रसिद्ध आहे. हा उठाव नियंत्रणात आणण्यासाठी ब्रिटिशांना एक वर्ष लागले व १८५८ साली त्यांना उठाव मोडून काढण्यात यश आले. त्यानंतर इंग्लंडच्या राणीने जाहीरनामा प्रसिद्ध करून येथून पुढे ब्रिटिश भारतातील राज्ये वा संस्थाने काबीज करणार नाहीत असे आश्वासन दिले. या घटनेनंतर भारतातील ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीचा अंमल संपुष्टात आला व भारताचा राज्यकारभार इंग्लंडच्या सरकारकडे गेला व पर्यायाने इंग्लंडच्या राणीचा अंमल सुरू झाला.

इंग्रजांच्या राजवटीत अनेक उच्चस्तरीय अधिकारी व अभ्यासकांनी भारताच्या विविध अंगांचा अभ्यास करण्यास सुरुवात केली. त्यांना भारताविषयी आपुलकी वाटू लागली व ते भारतीयांवरदेखील प्रेम करू लागले. अशाच इंग्रज (मूळ आयरिश वंशाच्या) व्यक्तींपैकी जिम कॉर्बेट हे होते.

जिम कॉर्बेट यांचा जन्म २५ जुलै १८७५ साली सध्याच्या उत्तराखंड या राज्यातील नैनीताल येथे झाला. त्यांचे वडील विल्यम ख्रिस्तोफर कॉर्बेट हे नैनीतालचे पोस्टमास्तर होते. जिम कॉर्बेट यांचे शिक्षण व संगोपन नैनीताल व कालाढुंगी या ठिकाणी झाले. शालेय शिक्षणानंतर त्यांनी ठेकेदारीचे काम केले तसेच रेल्वेचे इंधन निरीक्षक (Fuel Inspector) म्हणूनदेखील काम

केले. ही कामे करत असताना त्यांचा सामान्य भारतीय माणसांशी फार जवळून संबंध आला व त्यांना भारतीय माणसाचे मन समजू लागले. आपण लिहिलेल्या 'माय इंडिया' या पुस्तकात त्यांनी भारतीयांविषयीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. त्यांनी या पुस्तकात असे म्हटले आहे की, भारतीय लोक हे अतिशय एकनिष्ठ असून त्यांच्यावर कोणीही विश्वास ठेवावा असे आहेत. दुसऱ्या महायुद्धादरम्यान त्यांना मित्रराष्ट्रांच्या सैन्याला जंगलात युद्ध करण्याच्या कौशल्याचे प्रशिक्षण देण्याकरता घरापासून दूर राहावे लागले. तेव्हा त्यांची बहीण मॅगी ही त्यांच्या घरी एकटीच राहत होती. जिम कॉर्बेट म्हणतात, मला या काळात बहिणीची थोडीही काळजी वाटली नाही कारण मला विश्वास होता की, ती माझ्या भारतीय मित्रांमध्ये अतिशय सुरक्षित होती.

जिम कॉर्बेट यांची ओळख प्रामुख्याने ते शिकारी होते अशी आहे. त्यांनी गढ़वाल, नैनीताल, अलमोडा इत्यादी जिल्ह्यांतील अनेक गावांमध्ये नरभक्षक वाघ व बिबट्यांची शिकार केली. या नरभक्षक वन्य प्राण्यांनी १९०७ ते १९४० या कालावधीत हाहाकार उडवून दिला होता. काही वाघांनी व बिबट्यांनी तर ४०० हून अधिक व्यक्तींना खाल्ले होते. याची दखल इंग्लंडच्या संसदेनेदेखील घेतली होती व त्यावर संसदेत चर्चा झाली होती.

यामुळे अलमोडा व गढ़वालाच्या तत्कालीन आयुक्त व उपायुक्तांनी जिम कॉर्बेट यांना विनंती करून अनेक गावांना नरभक्षकांच्या दहशतीतून मुक्त करण्यास सांगितले होते. या अधिकाऱ्यांच्या विनंतीला मान देऊन त्यांनी अनेक नरभक्षक वाघ व बिबट्यांची शिकार केली होती. त्यांचे अशा शिकारींचे चित्तथरारक अनुभव त्यांनी आपल्या 'मॅन इटर्स ऑफ कुमाऊँ', 'द मॅन इटिंग लेपर्ड ऑफ रुद्रप्रयाग', 'द टेम्पल टायगर ॲण्ड मोअर मॅन इटर्स ऑफ कुमाऊँ' इत्यादी पुस्तकांमध्ये मांडले आहेत.

हरीण, रानडुक्कर इत्यादी वन्य प्राणी शेतकऱ्यांच्या शेतीत येऊन पिकाची नासधूस करत असत त्यामुळे जिम कॉर्बेट यांनी आपल्या गावाभोवती एक भिंत बांधली होती व त्याचा गावकऱ्यांना खूप फायदा झाला होता.

जिम कॉर्बेट यांनी आपल्या आयुष्याची अनेक वर्षे भारतीय व प्रामुख्याने उत्तराखंडाच्या जंगलांत घालवली. त्यांनी भारतीय वन्यजिवांचा व विविध वनस्पतींचा अभ्यास केला. त्यांनी नरभक्षक वाघ व बिबटे वगळता इतर वाघांची शिकार करणे टाळले. त्यांनी आपल्या जंगलातील अनुभवांवर अनेक पुस्तके लिहिली आहेत व ती वाचनीय आहेत. वाचकांनी त्यांची पुस्तके जरूर वाचावीत.

जसे जिम कॉर्बेट यांनी भारतीयांवर प्रेम केले त्याप्रमाणेच भारतीयांनीदेखील त्यांच्यावर प्रेम केले. जिम कॉर्बेट यांच्या मृत्यूनंतर अनेक वर्षांनी काही इंग्रज तंत्रज्ञ व दिग्दर्शक त्यांच्यावर चित्रपट बनवीत होते. त्या संदर्भात चित्रीकरण करण्याकरिता ते उत्तराखंडात आले होते. जिम कॉर्बेटची भूमिका एक इंग्रज नट करत होता. तेव्हा त्या दिग्दर्शकाने एक अनुभव सांगितला आहे की, एक ऐंशी वर्षांहून जास्त वय असलेली वृद्ध व्यक्ती चित्रीकरणाच्या ठिकाणी आली. त्या वृद्ध व्यक्तीने तेथे येऊन अक्षरश: त्या इंग्रज नटाचे पाय धरले व नतमस्तक होण्याचा प्रयत्न केला. त्या वृद्धास कितीही सांगितले की, हे जिम कॉर्बेट साहेब नसून त्यांची भूमिका करणारा नट आहे तरी तो विश्वास ठेवण्यास तयार नव्हता. ती वृद्ध व्यक्ती दोन दिवस घनदाट जंगलातून व दऱ्यांतून सलग चालून १०० किलोमीटर एवढे अंतर पार करून फक्त त्याच्या 'कारपीट' साहेबांना पाहण्यास आली होती. कारण तिच्या मनात दृढ श्रद्धा होती की कारपीट साहेब भारतात पुन्हा नक्कीच परततील. हे दृश्य पाहून त्या इंग्रज नटाचे व दिग्दर्शकाचे मन हेलावल्यावाचून राहिले नसेल. हा किस्सा म्हणजे जिम कॉर्बेट यांनी घनदाट जंगलात वसलेल्या गावांतील गरीब

भारतीयांची नरभक्षकांच्या तावडीतून मुक्तता केल्याची व त्यांना वेळोवेळी मदत केल्याची पोचपावती होय !

जिम कॉर्बेट यांनी भारतातील वने व प्रामुख्याने वन्यजिवांचे संवर्धन करण्याकरता जाणीवपूर्वक प्रयत्न केले. त्यामुळेच वाघ वा बिबट्या नरभक्षक आहे याची खात्री करूनच ते शिकार करत असत. त्यांनी शाळकरी मुलांना भारतीय वनसंपत्तीचा वारसा, वने व वन्यजिवांचे संवर्धन या विषयांवर अनेक व्याख्याने दिली. याच कारणासाठी त्यांनी 'असोशिएशन फॉर प्रिझर्वेशन ऑफ गेम इन युनायटेड प्रेव्हिन्सेस' व 'ऑल इंडिया कॉन्फरन्स फॉर द प्रिझर्वेशन ऑफ वाइल्ड लाइफ' या संस्थांना प्रोत्साहन दिले. त्यांनी आपल्या फ्रेडरिक वॉल्टर चँपियन या मित्रासोबत भारतातील कुमाऊँमध्ये वन्यजीवनाचे संवर्धन करण्याकरता राष्ट्रीय उद्यान स्थापन करण्यात पुढाकार घेतला. भारत सरकारने या राष्ट्रीय उद्यानास १९५७ साली जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान असे नाव दिले..

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत ब्रिटिश राजवटीतून स्वतंत्र झाल्यानंतर भारतातील अनेक ब्रिटिश व्यक्तींनी सुरक्षिततेच्या दृष्टीने भारतातून स्थलांतर करण्याचे ठरविले. त्यांपैकी जिम कॉर्बेट हे एक होते. ते ३० नोव्हेंबर १९४७ रोजी भारत सोडून आफ्रिकेतील केनिया या देशात जाण्यासाठी निघाले. त्यांनी असे लिहिले आहे की, आम्हांला आमचे भारतातील घर सोडल्याबद्दल फार वाईट वाटत होते आणि आम्ही जसजसे भारतापासून दूर जात होतो तसतसे आमच्या भारतातील खूप चांगल्या व विश्वासू मित्रांना सोडून जात असल्याबद्दल दु:ख वाटत होते.

या महान शिकाऱ्याचे व भारतीय वनांवर प्रेम करणाऱ्या व्यक्तीचे निधन १९ एप्रिल १९५५ रोजी केनियातील न्यायरी (Nyeri) या ठिकाणी झाले. त्यापूर्वी १८ एप्रिल १९५५ रोजी २० व्या शतकातील महान शास्त्रज्ञ अल्बर्ट आइन्स्टाइन यांचे निधन झाले. जिम कॉर्बेट यांच्या जीवनाचे अभ्यासक व तज्ज्ञ डी.सी.काला यांनी म्हटले आहे की, अल्बर्ट आइन्स्टाइन व जिम कॉर्बेट हे दोघेही आपापल्या क्षेत्रातील तज्ज्ञ होते. एकाचे क्षेत्र गणित व भौतिकशास्त्राचे होते तर दुसरा जंगलविद्येत प्रवीण होता. या दोघांनीही आपापल्या परीने निसर्गाच्या नियमांचा अभ्यास केला. ते पुढे म्हणतात, भारतावर प्रेम करणाऱ्या या शिकाऱ्याच्या मृत्यूची दखल भारतातील वृत्तपत्रांनी जशी घ्यायला हवी होती तशी घेतली नाही.

जिम कॉर्बेट यांच्या भारतीय वने व वन्यजिवांच्या संवर्धनातील योगदानाची माहिती भारतातील तरुण पिढीला होणे आवश्यक आहे. भारतावर व भारतीयांवर निस्सीम प्रेम करणाऱ्या व खऱ्या भारतीयत्वाची आपल्या लेखनातून जगाला ओळख करून देणाऱ्या या महान शिकाऱ्यास सलाम !

**संदर्भ**


१) कॉर्बेट जिम : माय इंडिया

२) कॉर्बेट जिम : द टेम्पल टायगर अ‍ॅण्ड मोअर मॅनइटर्स ऑफ कुमाऊँ

३) कॉर्बेट जिम : द मॅन इटिंग लेपर्ड ऑफ रुद्रप्रयाग

४) कॉर्बेट जिम : द मॅनइटर्स ऑफ कुमाऊँ

५) कॉर्बेट जिम : जंगल लोर

६) काला डी.सी. : जिम कॉर्बेट ऑफ कुमाऊँ

७) ग्रोव्हर व ग्रोव्हर : अ न्यू लुक अ‍ॅट मॉडर्न इंडियन हिस्ट्री

८) नंदा एस.पी. : हिस्ट्री ऑफ मिडिवल इंडिया



**– प्राध्यापक सुभाष गं. शिंदे**

उपप्राचार्य व इतिहास विभाग प्रमुख

जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे.


●●●

# अभियांत्रिकी नीतिशास्त्र

*नीतिमत्ता हा एक महत्वाचा गुण आहे. इतर अनेक व्यवसायांबरोबरच अभियांत्रिकी व्यवसायात देखील नीतिमत्तेला महत्वाचे स्थान आहे. त्याची कास सोडता कामा नये. - संपादक*

आज अभियांत्रिकी पेशा हा एक प्रतिष्ठित आणि सन्माननीय पेशा आहे. विज्ञानाची तत्त्वे वापरून अभियंत्यांनी केलेल्या तांत्रिक प्रगतीमुळेच समाज आज चांगल्या दर्जाचे जीवन जगू शकतोय. अभियांत्रिकी पेशाने जागतिक गुणवत्ता आणि कार्यक्षमता वाढविली, समाजाच्या असंख्य प्रश्नांवर तोडगे काढले, समाजाचा आर्थिक आणि सामाजिक स्तर उंचावला. एकंदरीतच सुखी-समाधानी समाज घडविण्यात अभियांत्रिकी पेशाचे मोलाचे योगदान आहे. येणारा काळ हा अभियंत्यांसाठी कसोटीचा काळ आहे. स्वतःला अभियंते म्हणवून घेणाऱ्या अभियांत्रिकी पेशातील व्यक्तींचे चारित्र्य, कर्तव्य, नैतिक तारतम्य या सगळ्यांचा अभ्यास होणे ही काळाची गरज आहे आणि त्यातूनच अभियांत्रिकी नीतिशास्त्र उदयास आले. आज अभियांत्रिकी नीतिशास्त्र ही स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून मान्यता पावली आहे. त्याचे स्वरूप समजून घेण्यापूर्वी आपल्याला नीती म्हणजे काय आणि नीतिशास्त्र म्हणजे काय ते समजून घ्यावे लागेल.

नीती हा शब्द नि - नेणे ह्या धातूपासून झालेला आहे. नयनान्नीति: म्हणजे जी नेते ती नीती. मी कोण आहे? माझा जन्म कशासाठी आहे? मी काय करायला हवे? मी ते कशा पद्धतीने करायला हवे, या मूलभूत प्रश्नांची उत्तरे प्रत्येक माणूस शोधत असतो कारण त्याचा भविष्यकाळ या प्रश्नांच्या उत्तरावर अवलंबून असतो. हे चार मूलभूत प्रश्न नीतिशास्त्राचा पाया आहेत. कारण मुळात मी काय करायला हवे? किंवा मी जे करीत आहे ते मी का करीत आहे याचे उचित कारण देता येणे म्हणजेच मी घेतलेला निर्णय अथवा स्वीकारलेले कार्य नैतिक आहे असे म्हणता येईल. व्यावसायिकाला अथवा तज्ज्ञ सेवा देणाऱ्या व्यक्तीला (Professional) त्याच्या अंतिम ध्येयाप्रत घेऊन जाते ती नीती म्हणजे व्यवसायनीती. अभियांत्रिकी नीतिशास्त्र ही व्यावसायिक नीतिशास्त्राची एक स्वतंत्र ज्ञानशाखा आहे जिचा अभ्यास आज अपरिहार्य झाला आहे.

अभियांत्रिकी नीतिशास्त्र म्हटले की आपल्या मनात अनेक प्रश्न येतात. अभियांत्रिकीत नीतिमूल्यांचे काय स्थान आहे? ती आवश्यक आहेत का? अभियांत्रिकीत नीतिमूल्यांचा कसा उपयोग होतो इ. अभियांत्रिकी हा वकिली, डॉक्टरी यांसारखा एक पेशा (Profession) आहे. त्यांना जसे समाजात वावरताना, व्यवहार करताना वर्तणुकीचे नीतिनियम पाळावे लागतात तसेच ते अभियंत्यांसाठी पण आहेत. अभियंत्याला किंवा अभियांत्रिकी संघटनेला अनेकदा निर्णय घेताना नैतिकतेचा विचार करावा लागतो. कोणताही तांत्रिक कार्यासंबंधीचा निर्णयघेताना नैतिकता, मूल्य, चारित्र्य, ध्येय, धोरणे, संघटना आणि लोकांचे आपल्या तांत्रिक कार्याशी निगडित असलेले हित-अहित या सर्वांचा विचार करावा लागतो.

साधारणपणे अभियांत्रिकी नीतिशास्त्राचे विश्लेषण तीन पातळ्यांवर केले जाते. पहिली - उद्योगसमूह. ज्या उद्योगसमूहात ते काम करीत असतात त्यांची ध्येय-धोरणे, तेथील मूल्ये आणि संस्कृती, उद्योगसमूह ज्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि विधी पर्यावरणात कार्य करीत असतो ते विचारात घेऊन त्याची बाजारमूल्यांशी सांगड घालून योग्य निर्णय घेणे. दुसरी - वेगवेगळे अभियंता संघ/समित्या अथवा ज्या उद्योगसमूहात ते काम करीत असतात

त्या संघटनेने ठरविलेले अभियांत्रिकी पेशाचे नैतिक वर्तनाचे निकष कोणते ते पाहणे. तिसरी - अभियंता व्यक्तींचे हक्क आणि त्यांच्या नैतिक बांधीलकीचे स्वरूप तपासणे.

आजच्या झपाट्याने बदलणाऱ्या वैज्ञानिक आणि तांत्रिक पर्यावरणात अनेक यांत्रिक-तांत्रिक करामती करण्याची आणि त्यांचे स्वामित्व घेण्याची चढाओढ लागली आहे. कारण नवनिर्मिती केल्याशिवाय आपण बाजारात टिकू शकणार नाही हे वास्तव सर्वांनीच स्वीकारलेले आहे. अशा वेळी आपण केलेली निर्मिती - मग ती कॉम्प्युटर सॉफ्टवेअर, मशीन, अथवा एखादी रचना (structure) काहीही असू शकेल - पर्यावरणाच्या आणि लोकांच्या दृष्टीने सुरक्षित आहे का हे आधी तपासून पाहिले पाहिजे. उदा. तुम्ही अभियंता आहात आणि एका बांधकाम क्षेत्रातील कंपनीत काम करीत आहात. एका नवीन इमारतीच्या बांधकामाचे टेंडर भरावयाचे आहे. तुमच्या ग्राहकाने त्यात काय काय मटेरिअल वापरायचे त्याचे वर्णन दिले आहे. एका विशिष्ट मटेरिअलचे स्वरूप तुम्हांस, तुमच्या सहकाऱ्यांस वा वरीष्ठांस माहीत नाही. तुमच्या वरीष्ठांनी कंपनीचा तुटपुंजा अनुभव ग्राहकाच्या लक्षात येऊ नये म्हणून तसेच टेंडर भरावयास सांगितले तर तुम्ही काय कराल? कदाचित ते मटेरिअल पर्यावरणाला आणि लोकांच्या आरोग्याला घातकही असू शकेल. तुम्ही याला विरोध केला तर तुमची नोकरीही जाऊ शकते. अशा परीस्थितीत एखादा निर्णय घेण्याची वेळ येते तेव्हा आपण घेत असलेला निर्णय चूक की बरोबर, योग्य की अयोग्य, नैतिक की अनैतिक असे अनेक प्रश्न उभे राहतात. अशी दोलायमान स्थिती आपल्या पेशात अनेकदा येते. अशा अनेक गोष्टी आहेत की त्या अभियंत्याला योग्य निर्णय घेण्यापासून रोखतात. उदा. ग्राहकाने जे मागितले आहे ते देणे आमचे कर्तव्य आहे, काही वेळा खर्च आणि वेळ वाचविण्यासाठी हे करावे लागते, कायमच नैतिकतेला धरून वागता येईल असे नाही इ. इ.

आजच्या बदलत्या सामाजिक आणि आर्थिक वातावरणात तंत्रज्ञान नवे, व्यवहारांचे स्वरूप नवे, व्यवस्थापन पद्धती नवी, कायदे नवे, संबंधांचे स्वरूप नवे, समस्या नव्या आणि नीतिनियम मात्र जुने यामुळे संभ्रमावस्था निर्माण होते. एखादी गोष्ट कायदेशीर असते, परंतु नैतिकतेच्या कसोटीवर ती अनैतिक ठरते. किंवा एखादी गोष्ट सामाजिकदृष्ट्या ग्राह्य तीच न्याय्य असेही म्हणता येत नाही. विशेषतः जेव्हा सर्व समाजच बिघडलेला असतो आणि चुकीच्या गोष्टींची पाठराखण करत असतो, अशा वेळी व्यावसायिकाला अथवा विविध पेशांतील व्यक्तींना परिस्थितीचा सर्व अंगाने साकल्याने अभ्यास करून निर्णय घ्यायचा असतो. त्यात आपल्या निर्णयाने विविध घटकांवर उदा. पर्यावरण, सरकार, संघटना, ग्राहक, कर्मचारी वर्ग, गुंतवणूकदार, समाज इ. वर काय परिणाम होईल हा विचार मुख्यअसतो. योग्य निर्णय घेताना जर द्विधा मनःस्थिती होत असेल तर फक्त एक कसोटी उपयुक्त ठरू शकेल. ती म्हणजे मी जे करतोय ते माझ्या मनाला पूर्णपणे पटते आहे का? आपला उद्देश साध्य करताना आपण स्वीकारलेला मार्ग, पद्धती, साधने कल्याणकारी आहेत का? की अंतिमतः ती विनाशाकडे घेऊन जाणारी आहेत? आणि त्याच्या परिणामांना वैयक्तिक जबाबदारी मानून सामोरे जाण्याची माझी तयारी आहे का? या प्रश्नांची उत्तरे होकारार्थी असतील तर खुशाल निर्णय घ्यायला हरकत नाही.

आज आपल्याला थांबता येणार नाही. बदलत्या काळाबरोबर बदलावे लागणार आहे, नवीन आव्हानांना सामोरे जावे लागणार आहे. जागतिक हवामानात होणारा बदल आणि अनेक नैसर्गिक संसाधनांचा संपत चाललेला साठा यांमुळे यापुढच्या पिढीला आणखी खडतर आव्हानांचा सामना करावा लागणार आहे. जी परिमित संसाधने आहेत त्यांचे रक्षण आणि उपयोग हा अत्यंत

**(पृष्ठ क्र. २९ वर)**

# थायलंडच्या सुरत थानी येथे संपन्न झालेले आगळेवेगळे कृतिसत्र

*अल्पखर्चिक प्रयोगाच्या मदतीने शालेय स्तरावरील विज्ञान व गणित हे विषय कसे शिकवावेत याचा अनुभव देण्यासाठी थायलंडमध्ये कृतिसत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्या कृत्रिसत्राचा हा अहवाल.- संपादक*

थायलंड हा प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करणारा आशिया खंडातील एक देश. आशियान गटात सहभागी झाल्यापासून या देशाने चांगलीच प्रगती केलेली आहे. या देशाने पर्यटन या क्षेत्रावर आपले लक्ष केंद्रित केले. त्यासाठी योग्य त्या सुविधा त्यांनी देशात निर्माण केल्या. आज मोठ्या संख्येने पर्यटक या देशात येतात. त्यातून त्या देशातील अनेकांना रोजगार मिळतो. पर्यटनाबरोबरच त्यांनी शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षणाकडेदेखील चांगले लक्ष पुरविले आहे. त्याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे ऑक्टोबर महिन्यात आयोजित केलेले कृतिसत्र. तीन दिवसांचे एक कृतिसत्र सुरत थानी या गावी १३ ते १५ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. कृतिसत्राचा विषय होता शालेय विज्ञान आणि गणित शिकविण्यासाठी अल्पखर्चीक साधने. या कृतिसत्राच्या आयोजनासाठी एका आंतरराष्ट्रीय संस्थेची मदत घेण्यात आली होती. सर्वप्रथम त्या संस्थेबद्दल माहिती करून घेऊ या.

इंटरनॅशनल कौन्सिल ऑफ असोसिएशन ऑफ सायन्स एज्युकेशन (International Council of Association of Science Education) या नावाची एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. थोडक्यात या संस्थेला आयकेस (ICASE) असे संबोधले जाते. संस्थेच्या नावावरूनच आपल्या असे लक्षात येईल की विज्ञान संघटनांची मोळी बांधणारी ही संस्था आहे. विज्ञानप्रसाराला वहिलेल्या स्वयंसेवी संघटना, विज्ञान शिक्षक संघटना तसेच विज्ञानशिक्षण प्रदान करणाऱ्या शाळा तथा महाविद्यालये या संस्थेचे सभासद होऊ शकतात. आयकेस या संस्थेच्या वतीने सायन्स एज्युकेशन इंटरनॅशनल (Science Education International) या नावाचे एक संशोधन प्रकाशन (journal) चालविले जाते. या जर्नलमध्ये देशोदेशींच्या संशोधकांनी लिहिलेले लेख प्रकाशित केले जातात. त्याचबरोबर आयकेस दर चार वर्षांतून एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावरील संमेलनाचे आयोजन करते. याखेरीज जगाच्या वेगवेगळ्या भागात कृतिसत्रे, प्रशिक्षण कार्यक्रम, विज्ञान स्पर्धा यांचे आयोजन करते. या संस्थेबद्दल आधिक माहिती हवी असल्यास वाचकांनी www.icaseonline.net या संकेतस्थळाला भेट द्यावी.

आयकेस या संस्थेचे एक कृतिशील सभासद डॉ. जांचाय यिंगप्रयून बँकॉक येथे राहतात. सौ. सुनंदा राजभट विद्यापीठाच्या आंतरराष्ट्रीय महविद्यालयाचे ते उपसंचालक आहेत. महविद्यालयीन स्तरावर अध्यापन करीत असताना शालेय शिक्षणातदेखील ते खूप रस घेतात. शालेय विद्यार्थ्यांसाठी मनोरंजक असे प्रयोग करून दाखविणे त्यांना आवडते. त्याचा अनुभव विद्या प्रसारक मंडळाच्या बांदोडकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घेतलेलाच आहे. मागच्या वर्षी ते जेव्हा एका आंतरराष्ट्रीय संमेलनाला हजर राहण्यासाठी मुंबईला आले होते तेव्हा मी त्यांना ठाणे महाविद्यालय परिसरात बोलाविले होते. माझ्या विनंतीवरून त्यांनी विद्यार्थ्यांसाठी भौतिक विज्ञानाचे गमतीशीर अध्यापन या विषयावर प्रयोगदिग्दर्शन केले होते. ते बांदोडकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना खूपच आवडले होते. काही काळ डॉ यिंगप्रयून यांनी आयकेस या संस्थेचे अध्यक्षपददेखील भूषविले होते. या संस्थेची

मदत घेऊन आशिया खंडातील विज्ञान आणि गणित शिक्षण सुधारावे यासाठी ते सतत प्रयत्नशील असतात. त्यांनी अनेक आशियाई देशांमध्ये अशा सभा-समेलनांचे आयोजन केले आहे. आयकेसचा आपल्या मायभूमीला उपयोग व्हावा यासाठी त्यांनी थायलंडमध्ये अनेक सत्रे आयोजित केलेली आहेत. अशाच एका कृतिसत्राचे पटाया येथे २०११ मध्ये त्यांनी आयोजन केले होते. या वेळेस त्यांनी थायलंडमधील सुरत थानी या गावाची निवड केली.

सुरत थानी हे गाव बँकॉकच्या दक्षिणेला सुमारे ८०० किलोमीटर अंतरावर वसलेले आहे. बँकॉक ते सुरत थानी प्रवासासाठी वातानुकूलित बसेस उपलब्ध आहेत. याखेरीज या प्रवासासाठी विमानसेवादेखील उपलब्ध आहे. या प्रवासाला एक तासाचा अवधी लागतो. थायलंड हा निसर्गसमृद्धीने नटलेला देश आहे. विमान जेव्हा सुरत थानी विमानतळावर उतरण्यासाठी खाली येते तेव्हा या विधानाची प्रचिती आपल्याला येते. विमानाच्या खिडकीतून बाहेर नजर टाकली की मनाला मोहवणारे निसर्गसौंदर्य आपल्या नजरेस पडते.



**विमानातून दिसणारा सुरत थानीचा परिसर**

आयकेस ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे. जगाच्या वेगवेगळ्या भागांत कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी या संस्थेला स्थनिक संस्थेची मदत घ्यावी लागते. प्रा. जांचाय यिंगप्रयून यांनी प्रयत्न करून स्थानिक स्तरावर सुरत थानी येथील प्रिन्स ऑफ सोक्ला विद्यापीठाचे सहकार्य मिळविले. या विद्यापीठाने कृतिसत्राच्या आयोजनाची संपूर्ण जबाबदारी स्वीकारली होती. त्यासाठी सुरत थानी शहरातील वांगटई हॉटेलमधील सभागृह तसेच राहण्यासठी खोल्या आधीच ठरवून ठेवल्या होत्या. हॉटेलच्या मालकीणबाई स्वतः उपस्थित राहून सर्व व्यवस्था चोख असल्याची खात्री जरून घेत होत्या. त्यामुळे एकाही पाहुण्याची गैरसोय झाली नाही की कृतिसत्रात खंड पडला नाही.



**वांगटाई हॉटेल : कृतिसत्राचे ठिकाण**

सुरत थानी येथे आयोजित केलेल्या कृतिसत्राला परिसरातील विज्ञान आणि गणित शिक्षकांना बोलाविण्यात आले होते. त्याचबरोबर माध्यमिक स्तरावर शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचादेखील समवेश करण्यात आला होता. त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी आयकेस या आंतरराष्ट्रीय संस्थेच्या माध्यमातून आणि डॉ. यिंगप्रयून यांच्या संपर्कातून विविध देशांतील तज्ज्ञ बोलाविण्यार आले होते. त्यांतील प्रमुख मार्गदर्शकांची नावे खाली दिलेली आहेत.

१. प्रा. लुओ शिंकाइ, गुआंग्शी विद्यापीठ, गुलीन, चीन
२. प्रा. योजी टाकिकावा, टोकाई विद्यापीठ, टोक्यो, जपान
३. प्रा. चीएन हेंग चाऊ, राष्ट्रीय विद्यापीठ, तायपेयी, तैवान
४. प्रा. सुधाकर आगरकर, विद्या प्रसारक मंडळ, ठाणे, भारत

दु:ख कवटाळत बसू नका, ते विसरा आणि सदैव हसत रहा.

५. प्रा. अलेक्झांडर फिशमॅन, कज़न विद्यापीठ, कज़न, रशिया

६. प्रा. हिडियो नाकानो, रेक्सॅम, पेनांग, मलेशिया

७. श्रीमती टेओ पोह यीऊ, क्रिएटिव विझार्ड, कुआलालम्पूर, मलेशिया

८. कु. डी जेंग ओंग, अमेझिंग किड्स, कुआलालम्पूर, मलेशिया

९. प्रा. क्रोंग्थोंग खैरारी, राजभट विद्यापीठ, बँकॉक, थायलंड

१०. प्रा. जांचाय यिंगप्रयून, आंतरराष्ट्रीय महाविद्यालय, बँकॉक, थायलंड

११. डॉ. हेरमन ग्रुएंवल्ड, बुरापा विद्यापीठ, चोंबुरी, थायलंड

१२. प्रा. सेप्पो करीला, प्रिन्स ऑफ सोक्ला विद्यापीठ, सुरत थानी, थायलंड

एवढी तज्ज्ञ मंडळी एकत्र आल्यानंतर कृतिसत्र प्रभावी झाले नसते तरच नवल. प्रत्येकाने आपापल्या सादरीकरणासाठी जय्यत तयारी केली होती. त्यासाठी त्यांनी येतानाच आपले साहित्य आणले होते. तैवानच्या प्रा. चाऊ यांचे साहित्य एवढे मोठे होते की त्यांना सीमाशुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी अनेक प्रश्न उपस्थित करून भंडावून सोडले. जपनच्या प्रा. टाकिकावा यांच्याकडे एवढे साहित्य होते की ते सांभाळण्यासठी एक सोबतीच त्यांना आणावा लागला. या सर्व साहित्याच्या मदतीने सादर केलेली प्रयोगसत्रे चांगलीच रंगली. सुरत थानी परिसरातील शिक्षकांना ही पर्वणीच होती. विद्यार्थी तर वेडेच झाले होते. कोणते उपकरण हाताळू आणि कोणते नाही असे त्यांना झाले होते. सर्वच प्रयोगदिग्दर्शनामध्ये विद्यार्थी आणि शिक्षक यांचा सहभाग उत्तम होता. या लहानशा लेखात सर्वच सत्रांची माहिती देणे अशक्य आहे. त्याऐवजी काही बोलकी चित्रे देण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.




**कृतिसत्राचा उदघाटन सोहळा**



**स्लींकीचा प्रयोग करताना आनंद घेणारे विद्यार्थी**




**अगडबंब फुग्यावर प्रयोग करणारा चिनी प्रध्यापक**




**जपानचे प्राध्यापक योजी टाकिकावा प्रयोग दाखविताना**




**प्रा. जांचाय यिंगप्रयून यांचे सादरीकरण**




**तैवानचे प्रा. चाऊ आपला पंखा प्रेक्षकांना दाखविताना**



**कृतिसत्रात मग्न झालेली शाळकरी मुले**

सदर कृतिसत्रात मी दोन प्रकारची सत्रे आयोजित केली. त्यांतील पहिले सत्र होते हसतखेळत विज्ञानशिक्षण या विषयावर. या सत्रात आपल्या आजूबाजूला ज्या वस्तू आढळतात त्यांचा उपयोग करून करता येण्यासारखे काही प्रयोग मी दाखविले. सगळ्यांना दिसायला सोयीचे व्हावे यासाठी या प्रयोगांची व्हिडिओ क्लिप मी आधीच करून घेतली होती. त्यामुळे पॉवरपॉइंटच्या मदतीने सगळे प्रयोग मी दाखविले. हे प्रयोग मनोरंजक असल्याने सगळ्यांचे लक्ष वेधून घेत असत. एकदाचे प्रयोगाचे नावीन्य संपले की मी त्या प्रयोगाचा उपयोग करून विज्ञानातील कोणत्या संकल्पना समाजावून देता येतात यावर चर्चा करीत असे. या चर्चेची शिक्षकांनी चांगलीच दखल घेतली. सहजसाध्य वस्तूंतून विज्ञानशिक्षण या विषयावर मागील काही वर्षे आम्ही कृतिसत्रे करीत आहोत. भारतात केलेल्या या कृतिसत्रांतून आम्हांला बरेच काही शिकायला मिळाले. त्याचीही चर्चा मी सदर सत्रात केली. प्रत्यक्ष प्रयोग करताना आलेले काही अनुभव मी कथन केले. इतर देशांतून आलेल्या तज्ज्ञ मंडळींनी त्या अनुभवांची दखल घेतली आणि त्यांवर अनेक प्रश्न मला विचारले.

माझे दुसरे सत्र आधारलेले होते ते भारतीय पारंपरिक खेळण्यांवर. देशाच्या वेगवेगळ्या भागांत लहान मुलांचे मनोरंजन करता यावे यासाठी वेगवेगळ्या प्रकारची खेळणी

बनविली जातात. वस्तूंची हालचाल, ध्वनिनिर्मिती यांवर ती प्रामुख्याने आधारित असतात. त्या प्रत्येक खेळण्याच्या कार्यात वैज्ञानिक सत्य दडलेले असते. म्हणून पारंपरिक खेळण्यांचा विज्ञान अध्यापनात उपयोग करता येतो असा मला विश्वास वाटतो. या तत्त्वाचा उपयोग करून मी खेळण्यांतील विज्ञान या विषयावर सत्रे आयोजित करीत असतो. अशी सत्रे मी भारताबरोबरच भारताबाहेरदेखील आयोजित केलेली आहेत. २०११ साली पटाया येथे आयोजित केलेल्या कृतिसत्रात मी यावर एक सत्र घेतले होते. ते लोकांना एवढे आवडले की या वेळेसदेखील असे सत्र असावे असा आग्रह आयोजकांनी धरला. त्यांच्या आग्रहाखातर काही पारंपरिक खेळणी मी माझ्या बॅगेतून घेऊन गेलो. प्रत्येक खेळणे दाखवून त्यातील विज्ञान मी विशद करून दाखविले. माझ्या या आगळ्यावेगळ्या सत्राला फारच चांगला प्रतिसाद मिळाला. माझे सत्र संपताच कृतिसत्रात सहभागी शिक्षक आणि विद्यार्थी खेळणी ठेवलेल्या टेबलाकडे धावले आणि त्यांनी खेळण्यांना अक्षरशः गराडाच घातला. त्यांतील प्रत्येकाला प्रत्येक खेळणे हाताळून पाहायचे होते. यांमध्ये विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षकदेखील आघाडीवर होते. आपले वय काहीही असो, आपल्यात एक बालक दडलेला असतो याची जाणीव मला त्या दिवशी प्रकर्षाने झाली. हा बालक जागृत ठेवणे हेच तर शिक्षणाचे मूळ उद्दिष्ट आहे.



**प्रयोगदिग्दर्शनानंतर भारतीय खेळण्यांच्या भोवती असा गराडा पडला**

**डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभव नगरी,
कल्याण-शीळ रोड,
काटई, ता. कल्याण
जि. ठाणे - ४२१२०४

●●●

---

**(अभियांत्रिकी नीतिशास्त्र...पान २४ वरून)**

काळजीपूर्वक व्हायला हवा. हे काम जबाबदारीचे आहे. त्याकरता अभियंत्यांनी चाकोरीबद्ध शिक्षण न घेता अभियांत्रिकीच्या इतर शाखांचाही अभ्यास केला पाहिजे. तरच, ते भविष्यातील आव्हानांना तोंड द्यायला समर्थ होतील. मानवाची कल्याणकारी प्रगती साधण्यासाठी आणि मानवाच्या चिरंतन अस्तित्वासाठी मर्यादित साधनसंपत्तीचा पर्याप्त वापर तसेच त्याला नवनवीन पर्याय शोधणे यात अभियंत्यांची भूमिका मुख्य राहील. त्यासाठी अभियंता हा केवळ तांत्रिक ज्ञानाने परिपूर्ण असून उपयोग नाही तर त्याला त्याच्या निर्मितीमुळे होणाऱ्या नैतिक परिणामांची जाणीव असणे तितकेच गरजेचे आहे. त्याचा दृष्टिकोन 'ॐ सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयः।' असा असायला हवा आणि तो तसा घडावा म्हणून हा अभियांत्रिकी नीतिशास्त्राचा खटाटोप.

**सौ. अनघा उदय गोखले**
प्राध्यापक
वि.प्र.मं. चे महर्षी परशुराम
महाविद्यालय, वेळणेश्वर
भ्रमणध्वनी : ९८५०८९०३८२

●●●

---

# भास्कर ९०० : चित्रदर्शन

*सप्टेम्बर महिन्याच्या १९, २० आणि २१ तारखांना ठाणे महाविद्यालय परिसरात भास्कर ९०० या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. परिषदेचा मुख्य विषय होता भास्कराचार्यांचे जीवन आणि त्यांचे कार्य. या विषयावर भारतातील तसेच भारताबाहेरील अभ्यासकानी आपापले प्रबंध सादर केले. या परिषदेचा थोडक्यात गोषवारा दिशा मासिकाच्या मागील अंकात देण्यात आला होता. ही आंतरराष्ट्रीय परिषद म्हणजे अभ्यासकांना एक पर्वणीच होती. विविध देशांतील संशोधकांचे संशोधन त्यांना माहीत करून घेता आले. त्याचबरोबर त्यांच्याशी प्रत्यक्ष संवाद साधता आला. परिषदेत सहभागी झालेल्या अनेकांनी आपल्या शंकांचे तज्ज्ञांकडून निरसन करून घेतले तर काहींनी आपल्याला वाटत असलेल्या मतांची खात्री करून घेतली. त्यामुळे चर्चेचे गुऱ्हाळ सभागृहाच्या बाहेरदेखील सुरू असायचे. अशा महत्त्वाच्या परिषदेची माहिती चित्ररूपात द्यावी असा आग्रह दिशा मसिकाच्या अनेक वाचकांनी धरला. त्यांच्या आग्रहास्तव काही क्षणचित्रे येथे दिलेली आहेत.* **- संपादक**



**परिषदेत सहभगी झालेले काही ज्येष्ठ सभासद**




**डॉ. अरविंद जामखेडकर आपले विचार मांडताना**



**परिषदेत सहभागी झालेले महविद्यालयीन विद्यार्थी**




**दोन तरुण मुले मंगलाचरण सादर करताना**



प्रा. बालचंद्रराव आपला प्रबंध सादर करताना



भारतीय आणि जपानी तज्ज्ञांमधील अनौपचारिक चर्चा




सौ. लिमये आपले विचार मांडताना



प्राध्यापक सर्मा आपले मत प्रकट करताना




परिषदेतील सांस्कृतिक कार्यक्रम



डॉ. व्यवहारे आपली शंका उपस्थित करताना

---

चुकीचा व्यवहार माणसं तोडतो म्हणून तो सत्याने आणि सन्मानाने करा.


प्रा. श्रीराम चौथाईवाले आपले विचार मांडताना



प्रा. सुधाकर आगरकर परिषदेचे संचलन करताना



सोमनाथ चटर्जी आपला प्रबंध सदर करताना


स्वयंसेवकांचा चमू



अमेरिकेतील प्रा. हरी कोइराला आपले विचार मांडताना


जेवणाची व्यवस्था पाहणारा स्वयंसेवक समूह

---

नवं काहीतरी शिकण्यासाठी मिळालेला वेळ म्हणजे सुट्टी.



चेन्नईचे प्राध्यापक श्रीराम व्याख्यान देताना




जपानचे डॉ. यिकियामा आपले संशोधन सादर करताना




सौ. अनन्या मित्रा आपले विचार मांडताना




न्यूझीलंडच्या क्लिमेन्सी मोंतेल आपले संशोधन सादर करताना




प्रा. मीनल वानखेडे आपला प्रबंध सादर करताना




श्री. शास्त्री परिषदेविषयी आपले विचार मांडताना

# परिसर वार्ता

**- संकलित**

## जोशी-बेडेकर महाविद्यालय

### कला वाणिज्य महाविद्यालयाचा वृत्तान्त
### महिला विकास कक्ष (W.D.C.)

महाविद्यालयाच्या महिला विकास कक्षाच्या वतीने दिनांक ९ व १० जानेवारी २०१५ रोजी दोन दिवसीय परीषद आयोजित केली आहे. या परिषदेचा विषय 'भारतीय स्त्रियांची समानतेची आस-वचने, समस्या व भवितव्य' असा आहे. या विषयाबद्दल महाविद्यालयीन मुलांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने दि. २२ ऑगस्ट २०१४ रोजी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात २५ महाविद्यालयांचा सहभाग होता. विजेत्या स्पर्धकांच्या कार्यक्रमाचे सादरीकरण राष्ट्रीय परिषदेत करता येणार आहे.

या स्पर्धांचे उद्घाटन महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांच्या हस्ते झाले. त्यांनी स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या स्पर्धेचे आयोजन प्रा. प्रियंवदा टोकेकर, प्रा. डॉ. अनिल ढवळे, प्रा. डॉ. सुजा अब्राहम, प्रा. नोनिता कोलनूरकर, प्रा. मोनिका देशपांडे, प्रा. नीलम शेख व प्रा. शिवाजी नाईक यांनी केले.

### यूथ फेस्टिव्हल - २०१४

४७ व्या यूथ फेस्टिव्हलमध्ये महाविद्यालयाने ठाणे झोन नं. ४, झोनल फेरीतील २८ स्पर्धांपैकी २३ स्पर्धांमध्ये भरघोस यश प्राप्त केले. या स्पर्धा ११ ऑगस्ट रोजी घेण्यात आल्या होत्या. यशस्वी स्पर्धक-स्पर्धा व क्रमांक पुढीलप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| One Act Play Gr. A | प्रथम क्रमांक |
| Skit Gr. A | प्रथम क्रमांक |
| Skit Gr. C | प्रथम क्रमांक |
| Mono Acting Gr. A | द्वितीय क्रमांक |
| One Act Play Gr. C | प्रथम क्रमांक |
| Mono Acting Gr. C | द्वितीय क्रमांक |
| Mime | द्वितीय क्रमांक |
| Classical Instrumental (तबला) | प्रथम क्रमांक |
| Indian Light Vocal | द्वितीय क्रमांक |
| Indian Group Song | प्रथम क्रमांक |
| Western Instrumental | द्वितीय क्रमांक |
| Western Group Song | प्रथम क्रमांक |
| Indian Classical Dance | द्वितीय क्रमांक |
| Folk Dance | तृतीय क्रमांक |
| Elocution Gr. A | प्रथम क्रमांक |
| Debate Gr. A | प्रथम क्रमांक |
| Elocution Gr. B | प्रथम क्रमांक |
| Debate Gr. B | तृतीय क्रमांक |
| Collage | प्रथम क्रमांक |
| On the spot painting | प्रथम क्रमांक |
| Rangoli | प्रथम क्रमांक |
| Cartooning | द्वितीय क्रमांक |

### संस्कृत विभाग

महाविद्यालयाच्या संस्कृत विभागातर्फे संस्कृत दिनोत्सव साजरा करण्यात आला. उत्सवाचे उद्घाटन प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह व कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी डॉ. सुचिता सावंत यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी प्राचार्यांनी संस्कृत भाषेच्या प्रसारासाठी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी डॉ. सुचिता सावंत यांना 'भारतीय सणांचे वैज्ञानिक महत्त्व' या विषयावर उत्कृष्ट व्याख्यान दिले. विभागाच्या प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षांच्या विद्यार्थ्यांनी मराठी गीते व लावणी संस्कृतातून सादर केली. माहितीतल्या कथांचे संस्कृत नाट्यरूपांतर करून सादर करण्यात आले. विविध संस्था व विभागांच्या घोषवाक्यांची माहिती विद्यार्थ्यांना करून देण्यात आली, तसेच विद्यार्थ्यांनी

मेघदूताचे श्लोक गीतबद्ध करून त्यांवर शास्त्रीय नृत्य सादर केले. उत्सवाचे शीर्षक 'जुनं ते सोन' असे होते. तसेच कविकुलगुरू कालिदास यांच्या स्मरणार्थ हा उत्सव साजरा करण्यात आला. PPT द्वारे संस्कृत साहित्याची ओळख करून उत्सव साजरा करण्यात आला. विभागप्रमुख सौ. स्वाती महेश भालेराव तसेच सहप्राध्यापिका पूजा कदम यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेकरता परिश्रम घेतले.

**स्वच्छ भारत अभियान**

२ ऑक्टोबरला गांधी जयंतीनिमित्त पंतप्रधान नरेन्द्र मोदी यांनी पुकारलेल्या 'स्वच्छ भारत अभियान' या उपक्रमांतर्गत महाविद्यालयातदेखील या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग, एन.एस.एस., एन.सी.सी. व महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना प्राचार्यांनी 'स्वच्छ भारत अभियाना' करता शपथ दिली तसेच त्या सर्वांना उत्कृष्ट मार्गदर्शन करताना म्हणाल्या की, विद्यार्थी तसेच प्राध्यापकांनी, समाजाने स्वच्छता ही आपली नैतिक जवाबदारी आहे' असे मानले पाहिजे. महाविद्यालयाची अभियानांतर्गत असलेली भूमिका स्पष्ट करताना प्राचार्या म्हणाल्या की, बाह्य स्वच्छतेच्या आग्रहाबरोबरच आंतरिक स्वच्छतेवरही सर्वांनी भर द्यायला हवा. मन, वचन, कर्म यांच्या स्वच्छतेसोबतच या अभियानाची सर्व उद्दिष्टे सफल होतील. प्राचार्यांनी योगाचे महत्त्व सांगितले. महात्मा गांधी व स्वामी विवेकानंदांच्या विचारांवरही त्यांनी प्रकाश टाकला.

या प्रसंगी सर्व उपस्थितांनी, प्राध्यापकांनी, प्राचार्या, उपप्राचार्यांनी, तसेच विद्यार्थ्यांनी हातांत झाडू घेऊन महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करून अभियानाची सांगता केली व हे अभियान रोजच चालू ठेवावे अशी इच्छाही व्यक्त केली.

**Talent Academy**

या वर्षीचा मुंबई विद्यापीठाचा युवा महोत्सव नुकताच पार पडला. त्यात विविध स्पर्धा घेण्यात आल्या. या वर्षी जोशी-बेडेकर कला-वाणिज्य महाविद्यालयाने ठाणे विभागात प्रथम क्रमांक मिळवला. तसेच विद्यापीठाच्या अंतिम स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवले.

गतवर्षी ४६ व्या युवा महोत्सवात महाविद्यालयाला द्वितीय स्थानावर समाधान मानावे लागले होते. पण या वर्षी विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकासाठी अथक प्रयत्न केले व भरघोस यश संपादित केले.

तसेच कै. प्रवीण जोशी आंतरमहाविद्यालयीन मराठी एकांकीका स्पर्धा म्हणजे Indian National Theatre (INT) घेण्यात आली, त्यात महाविद्यालयास प्रथम क्रमांक प्राप्त झाला. त्याचप्रमाणे प्रथमच महाराष्ट्र टाइम्सकडून सुरू करण्यात आलेल्या एकांकीका स्पर्धेचे प्रथम पारितोषिकही 'करंडक' स्वरूपात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'मोज्लेम' (Mojlem) या एकांकिकेस प्राप्त झाले.

**उत्कृष्ट एकांकिका**

उत्कृष्ट ध्वनी व प्रकाश व्यवस्था, उत्कृष्ट दिग्दर्शन, उत्कृष्ट नायिका, उत्कृष्ट लेखन इत्यादी सर्व बक्षीसे या नाटकास प्राप्त झालीत.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

**अभिनंदन**

प्रा. प्रकाश माळी, रसायनशास्त्र विभाग, यांना अलीकडे विविध पुरस्कारांनी गौरविण्यात आले. त्यांचे हार्दिक अभिनंदन.

- मुंबई तरुण भारत, यांच्यातर्फे ''आदर्श शिक्षक पुरस्कार २०१४''
- Lions Club चा "Best Lions Club President Award 2014" पुरस्कार.
- 'सहयोग बहुउद्देशीय संस्था', ठाणे या संस्थेतर्फे सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल विशेष सन्मान.

• सायन्स फाउंडेशन (महाराष्ट्र) तर्फे ''राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार''

• ''लोकसत्ता गणेश उत्सव मूर्ती स्पर्धा २०१४'' या स्पर्धेतील प्राथमिक फेरीचे परीक्षण आणि प्रतिनिधित्व केल्याबद्दल सन्मानपत्र प्रदान.

प्रा. सौ. आकांक्षा शिंदे, गणित विभाग, यांचा "Left Iso-operators in Iso Hilbert Iso-spaces हा संशोधनपर पेपर Clifford Analysis Clifford Algebras and their Applications या आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रसिद्ध झाला त्याबद्दल हार्दिक अभिनंदन.

**प्रमाणपत्र अभ्यासक्रम**

रसायनशास्त्र विभागातर्फे "Basic Principles : Preparations and Standardization of Solutions" या विषयावर ७ ऑगस्ट ते ९ ऑगस्ट २०१४ या कालावधीत प्रमाणपत्र अभ्यासक्रम घेण्यात आला.

या अभ्यासक्रमाचे उद्घाटन डॉ. नूपुर मेहरोत्रा संयोजक व सहप्राध्यापक, मिठीबाई महाविद्यालय, विलेपार्ले यांच्या हस्ते झाले.

या वेळी विद्यार्थ्यांना प्रा. डॉ. उल्हास पंडित, यांनी Preparation of Solution या विषयावर माहिती दिली, डॉ. अनिता गोस्वामी-गिरी यांनी Preparation of Buffer बद्दल विद्यार्थ्यांशी संवाद साधला. डॉ. पूजा जगासिया यांनी Selection of Indicators for various Acid base Tifrations बद्दल माहिती दिली.

या वेळी विद्यार्थ्यांना विविध द्रावके बनवण्याचे Hands on Training देण्यात आले. ४३ विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमात सहभाग घेतला.

**हिंदी दिवस**

१७ सप्टेंबर २०१४ रोजी महाविद्यालयात हिंदी दिवस साजरा करण्यात आला. या वेळी कवी व दूरदर्शनचे कलाकार डॉ. मुकेश गौतम व श्री. सुरेश मिश्रा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांनी सामाजिक व राजकीय घडामोडींबद्दल कविता सादर केल्या. तसेच महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'दहेकते अंगारे' ही स्त्रियांच्या समस्यांवर आधारित नाटुकली सादर केली. महाविद्यालयाच्या काही शिक्षकांनीदेखील सामाजिक विषयांवर कविता सादर केल्या. ३ विद्यार्थ्यांनी हिंदी भाषा व हिंदी साहित्य यांबद्दल माहिती सादर केली. कार्यक्रमासाठी सुमारे २५० विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

**संस्कृत दिवस**

संस्कृत विभागातर्फे ७ ऑक्टोबर २०१४ रोजी पतंजली सभागृहात संस्कृत दिवस साजरा करण्यात आला. "Science in Sanskrit" हा विषय येथे मांडण्यात आला. या वेळी डॉ. प्रतिभा माथुर, विभागप्रमुख, जोशी-बेडेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी संस्कृत साहित्य, संस्कृत लेखक व कवी यांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. ५ विद्यार्थ्यांनी संस्कृत भाषा व संस्कृत साहित्य यांबद्दल माहिती दिली.

या वेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सहकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थ्यांनी केले.

**'जागर जाणिवांचा' अभियान**

'जागर जाणिवांचा' अभियानांतर्गत आयोजित केलेल्या सर्वेक्षणानुसार विद्यार्थिनींकडून आलेल्या सूचनांवर आधारित Polycystic ovarian Syndrome (PCOS) या विषयावर केवळ मुलींकरता डॉ. उमा बन्सल (स्त्रीरोगतज्ज्ञ) यांचे आरोग्यपूर्ण व संपूर्ण मातृत्व या संकल्पनेवरील व्याख्यान पतंजली सभागृहात सोमवार दि. २९.०९.२०१४ सकाळी ८.०० वाजता आयोजित केले होते.

डॉ. उमा बन्सल या जर्मनीतून संशोधन करून भारतात आल्या आहेत व ठाण्यामध्ये त्यांचे स्वतःचे IVF केंद्र असून त्यांनी हजारो रुग्णांवर वंध्यत्वावरील यशस्वी

उपचार केले आहेत व अपत्यप्राप्तीचे समाधान प्राप्त करून दिले आहे. ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटल, कौशल्य हॉस्पिटल व INNER WHEEL इत्यादी मोठ्या आरोग्य संस्थांशी त्या संबंधित आहेत.

एका सर्वेक्षणानुसार समाजातील ५ पैकी २ मुलींना PCOS या मासिक पाळीसंबंधित आजाराने ग्रासले आहे. याबद्दल पुरेशी माहिती नसल्यामुळे आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन न मिळाल्यामुळे चुकीची औषधे व उपायोजना केल्यामुळे याचे अन्य दुषपरिणाम जाणवतात. जसे वजन वाढणे, स्थुलपणा, नैराश्य इ.

कनिष्ठ महाविद्यालयातील व पदवी महाविद्यालयातील मिळून २३० विद्यार्थिनींनी या आरोगयपूर्ण व्याख्यानाचा लाभ घेतला. या वेळी डॉ. उमा बन्सल म्हणाल्या की चुकीची जीवनपद्धती विद्यार्थीदशेतील तणाव. खाण्यापिण्याच्या अयोग्य पद्धती, असंतुलित आहार व व्यायामाच्या अभाव इत्यादी कारणांमुळे PCOS ची लक्षणे दिसू लागतात. सुरुवातीच्या काळातच उपचाार केले तर हा Syndrome बरा होऊ शकतो. Life Sytle मुळे बळावणारा हा Syndrome Life Sytle बदलामुळेच आटोक्यात आणता येईल. आपल्या मासिक पाळीसंदर्भात काही तक्रारी असल्यास वेळीच त्यांचे स्त्रीरोगतज्ज्ञांमार्फत निदान करून औषधोपचार करायला हवा त्यामुळे पुढील काही मोठे धोके टाळता येऊ शकतात. जसे गर्भाशयात गाठी तयार होणे, भविष्यकाळात लग्नानंतर संततीत दोष निर्माण होणे, मंगोलियन सिंड्रोम इत्यादी. यामध्ये महाविद्यालयीन स्तरावर जर या सिंड्रोमबद्दल जागरूकता निर्माण केली तर पुढील बरेच धोके टाळले जाऊ शकतील असेही त्या म्हणाल्या. लग्नाचा विचार योग्य वयात व वयाच्या पस्तिशीच्या आधी संततीचा विचार करायला हवा त्यामुळे गर्भाशयासंबंधित हे आजार व धोके उद्‌भवत नाहीत.

विविध प्रश्नोत्तरांनी चालू असलेल्या या व्याख्यानात डॉ. उमा बन्सल यांनी काय करावे व काय करू नये; जसे Junk Food टाळावे, योग्य आणि संतुलित आहार घ्यावा, नियमित योगाभ्यास करावा, झोप व आराम वेळच्या वेळी घ्यावा असे सुचविले तसेच मानसिक ताणतणावांचेही नियोजन झाल्यास या सिंड्रोमपासून वाचता येईल असे त्या म्हणाल्या.

प्रश्नोत्तराच्या तासामध्ये विविध वयोगटातील विद्यार्थिनींनी आपल्या समस्या व अडचणी सांगून डॉ. उमा बन्सल यांचे मार्गदर्शन घेतले. फक्त स्त्रियांकरता असणाऱ्या या व्याख्यानात सर्व विद्यार्थिनींनी मोकळेपणाने आपल्या स्वतःच्या, मैत्रिणींच्या व अगदी आईच्याही काही समस्यांबद्दल डॉ. उमा बन्सल यांच्याशी चर्चा करून शंकांचे निरसन करून घेतले. अगदी दिलखुलास पद्धतीने डॉ. उमा बन्सल यांनी त्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली व उपाय सांगितले. महाविद्यालयातील प्राध्यापिकांनीही या व्याख्यानाचा लाभ घेतला व शेवटी राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.

## तंत्रनिकेतन

### मोफत संपूर्ण शरीर चिकित्सा शिबिराचे आयोजन

विद्या प्रसारक मंडळे तंत्रनिकेतनच्या मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स् विभागातर्फे तंत्रनिकेतनमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी मोफत संपूर्ण शरीर चिकित्सा शिबिराचे आयोजन केले होते. सदरचे शिबिर दि. ११ ऑगस्ट २०१४ रोजी सकाळी १०.३० ते ५.३० या वेळेत मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स् विभागातील प्रयोगशाळा क्रमांक ३ मध्ये भरविण्यात आले होते. युनिकेअर हेल्थ सेंटर, घाटकोपर मुंबई तर्फे हे शिबिर होते.

मोफत शरीर तपासणीमध्ये नाडी परीक्षण, प्रकृती परीक्षण, आहार सल्ला, रक्तदाब, मधुमेह, बीएमआय व बॉडी फॅट, संपूर्ण बॉडी स्कॅनिंग मशीनद्वारे व अल्प खर्चात इत्यादी बाबींचा समावेश होता. शिवाय शिबिरात येणाऱ्या व्यक्तीस एक वर्षाचे फ्री चेकअप पास व काही आयुर्वेदिक सूट दिली जाईल असे ही सांगण्यात आले. डॉ. माधव संजय आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उत्तमप्रकारे तपासणी

केली आणि सल्ले दिले. अधिक माहितीकरिता ९२२१००८८९३ या मोबाईल नंबरवर संपर्क साधावा असे सांगण्यात आले.

सदर तपासणी आयोजनासाठी वि.प्र.मंडळाच्या तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक व मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा. टि. व्ही. मोहिते पाटील यांनी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नामुळे सदरच्या शिबिराचा शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ घेता आला.

**'अभियंता' दिनाचे आयोजन**

देशात अभियांत्रिकीच्या तंत्रज्ञानाचा पाया घालणारे भारताचे एम विश्वश्वरैय्या यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून दरवर्षी भारतात १५ सप्टेंबरला अभियंता दिवस पाळला जातो. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी तंत्रनिकेतनात 'अभियांत्रिकी दिन'१५ सप्टेंबर २०१४ रोजी तंत्रनिकेतनातील विद्यार्थ्यांनी ए. व्ही. रुम मध्ये साजरा केला.

तंत्रनिकेतनाचे प्राचार्य दि. कृ. नायक आणि शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थीवर्ग मोठ्या संख्येने हजर होते. या दरम्यान विद्यार्थ्यांनी पेपर प्रेझेंटेशन केले.

एम. विश्वेश्वरैया यांचे अभियांत्रिकी क्षेत्रात फार मोठे योगदान होते. पुण्यात अभियांत्रिकी शिक्षण घेऊन मुंबई येथे सार्वजनिक बांधकाम विभागात सहाय्यक अभियंता म्हणून त्यांनी कार्याची सुरुवात केली. मोठ-मोठी धरणे, पूल उभारणी, बंधारे, नगररचना इत्यादीच्या नियोजनात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते.

त्यांच्या अभियांत्रिकी क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल १९५५ सालचा 'भारतरत्न' त्यांना बहाल करण्यात आला. शिवाय ब्रिटिश सरकारने त्यांना 'सर' ही पदवी दिली होती.

अशा या महान अभियंत्याच्या कार्याची आठवण म्हणून १५ सप्टेंबर हा त्यांचा जन्मदिन हा भारतात 'अभियांत्रिकी दिन' म्हणून ओळखला जातो.

**ग्रंथालयातील सहाय्यक ग्रंथपाल सौ. बी. ए. जोशी सेवानिवृत्त**



विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनमधील ग्रंथालयाच्या सहाय्यक ग्रंथपाल सौ. बी. ए. जोशी ह्या दि. ३० सप्टेंबर २०१४ रोजी सेवानिवृत्त झाल्या. सौ. जोशी ह्या तंत्रनिकेतनच्या ग्रंथालय सेवेत १६ ऑगस्ट १९९० साली रुजू झाल्या होत्या. आपल्या २४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर त्या ३० सप्टेंबर रोजी सेवानिवृत्त झाल्या.

तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, माजी प्राचार्य एस.एस. मुजुमदार, विभागप्रमुख यांचेतर्फे त्यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. ग्रंथालयातील कर्मचारी आणि मुजूमदार सर याचेतर्फेसुद्धा त्यांना भेटवस्तू, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार केला. अनेक विद्यार्थ्यी, शिक्षक यांनी वैयक्तिक भेटून त्यांना पुढील आयुष्याकरिता शुभेच्छा दिल्या.

सौ. जोशी मॅडम ह्या अशासकीय शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी महासंघ तंत्रनिकेतन युनिटच्या सदस्य होत्या. तंत्रनिकतन युनिटच्यावतीनेही त्यांच्या युनियनचे ज्येष्ठ सदस्य श्री. एस.एल. खापणे यांच्या शुभहस्ते भेटवस्तू, पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार केला. या प्रसंगी अनेक मान्यवरांनी त्यांच्याविषयी गौरवद्‌गार काढले.


सौ. जोशी मॅडम ह्या अत्यंत शिस्तप्रिय म्हणून परिचित होत्या. ग्रंथालयीन कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव त्यांना होता. त्यांच्यावर सोपविलेली कोणतीही जबाबदारी त्या अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडीत होत्या. त्यांना वाचनाची फार आवड होती.

सौ. जोशी मॅडम यांना पुढील आयुष्य आरोग्य पूर्ण जावो अशी सदिच्छा!

●●●

(पृष्ठ क्र. २ वरून - **संपादकीय**)


"but it is not so. He created beings and let them develop according to internal laws which He gave everyone, so they would develop, so they would reach maturty."




**चार्ल्स्‌ डार्विन यांचे लंडनजवळील डाऊन या खेड्यातील घर**

देवाची ही 'दैवी शक्ती' काढून घेऊन मात्र त्यांनी एक क्रांती केली आहे. एवढे धाडस याआधीच्या कुठल्याच धर्मगुरूंनी दाखविले नव्हते.


रचनावाद पटवून देणे हे जसे कठीण जात होते तसे रचनावादी नवीन नवीन शब्दरचना करून बायबलमधील वचनांची सत्यता पटविण्याचा प्रयत्न करत होते. पोप फ्रान्सिस यांच्याआधीच पोप बेनेडिक्ट सोळावे यांनी 'कल्पक रचनावादा'ला (Intelligent Design) संमती दिली होती. या वादाचे खरे कर्ते हे विल्यम पॅले (William Paley-1803) असून देवाच्या अस्तित्वाकरता त्यांनी घड्याळाचे रूपक वापरले. घड्याळ अनेक लहान लहान घटकांनी बनलेले असते, आणि ते बनवण्याकरता एका 'घड्याळजी'ची गरज असते. घड्याळजी नसेल तर असे घड्याळ निर्माण होऊ शकेल का? असा वरकरणी पडणारा प्रश्न त्यांनी केला. पुढे जाऊन त्यांनी पृष्ठवंशीय (Vertibrate) प्राण्यांच्या डोळ्याचे उदाहरण घेतले, आणि डोळ्यासारखा गुंतागुंतीचा अवयव निर्मात्याशिवाय कसा निर्माण होऊ शकेल हा प्रश्नही त्यांनी केला. पॅले यांच्या ह्या उदाहरणांच्या ३०-४० वर्षांनंतर डार्विनने आपल्या 'नैसर्गिक निवडी' (natural selection) वर आधारित उत्क्रांतिवाद मांडला. १८५९ साली "On the origin of species" या आपल्या पुस्तकामध्ये त्याने डोळ्यासारखा गुंतागुंतीचा अवयवसुद्धा 'नैसर्गिक निवड' या




**अमेरिकेमध्ये उत्क्रांतिवादाचा प्रतिवाद करणारी पुस्तके विकताना**


सिद्धांताप्रमाणे कसा निर्माण होऊ शकतो याचे विवेचन केले आहे. डार्विनच्याच शब्दांत ते वाचणे योग्य ठरेल. "To suppose that the eye, with all its inimitable contrivances for adjusting the focus to different distances, for admitting different amounts of light, and for the correction of spherical and chromatic aberration, could have been formed by natural selection, seems- I freely confess, absurd in the

highest possible degree. Yet reason tells me, that if numerous gradations from a perfect and complex eye to one very imperfect and simple, each grade being useful to its possessor, can be shown to exist, if further, the eye does very ever so slightly, and the variations be inhetited, which is cettainly, the case and if any variation or modification in the organ be ever useful to an animal under changing conditions of life, then the difficulty of believing that a perfct and complex eye could be formed by natural slection, though insuperable by out imagination, can hardly be considered real.



**उत्क्रांतिवादाचा सिद्धान्त शब्दबद्ध करत असताना त्याचे विवरण करणाऱ्या डार्विनच्या हस्तलिखिताचे रेखाचित्र**

डार्विनने आपला उत्क्रांतिवादाचा सिद्धान्त, "The origin of species - By means of Natural Selections" हा ग्रंथ १८५९ साली लिहून प्रथम मांडला. १८३१ ते १८३६ या कालावधीत 'बीगल' या जहाजातून त्याने दक्षिण अमेरिका आणि जवळपासच्या अनेक बेटांचा प्रवास केला होता. मानवाच्या उत्क्रांतीची संकल्पना त्याला ह्या प्रवासातील प्राण्यांच्या आणि वनस्पतींच्या निरीक्षणातून सुचली. डार्विनने आपल्या प्रवासामध्ये लाईल (Lyell) यांचे भूगर्भशास्त्रावरील पुस्तक आणि एक जर्मन बायबलही घेतले होते. त्यांने आपला उत्कांतिवादाचा सिद्धान्त मांडताना या सिद्धान्ताच्या संदर्भात आपल्या तत्कालीन मित्रांना पत्र लिहून त्यांचे अभिप्रायही मागितल्याच्या नोंदी आहेत. १८५६ च्या सुमाराला त्याने आपले विचार प्रत्यक्ष लिखित स्वरूपात मांडायला सुरुवात केली. १८५८ साली त्याचे एक मित्र वॅलेस (Alfred Russel Wallace) यांचे त्याला पत्र आले, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे आपल्या उत्क्रांतिवादाच्या सिद्धान्ताच्या पुष्टीकरता जो 'नैसर्गिक निवडी' चा सिद्धान्त तो मांडत होता, तंतोतंत तोच सिद्धांत




**'द ओरिजिन ऑफ स्पेसिस' या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचे मुखपृष्ठ**

वॅलेस यांनी पत्रातून त्याला कळविला होता. हे साम्य बघून डार्विनही आश्चर्यचकित झाला आणि आपले मित्र लाईल (Lyell) यांचा सल्ला त्याने घेतला. साहजिकच लाईल यांनी डार्विनला सूचित केले की डार्विन आणि वॅलेस या दोघांनी एकत्रितपणे हा सिद्धान्त शास्त्रज्ञांपुढे मांडावा. काही कारणांमुळे डार्विनला ते करणे शक्य नव्हते म्हणून लाईल यांनी दुसरे एक शास्त्रज्ञ हूकर यांच्या मदतीने वॅलेस आणि डार्विन यांच्या लेखांवर आधारित एक शोधनिबंध लंडनच्या लिनिएन (Linnean) सोसायटीमध्ये १ जुलै १८५८ रोजी मांडला. त्याच वर्षीच्या लिनिएन सोसायटीच्या संशोधनपत्रिकेमध्ये तो 'On the Tendency of Species to from varieties and on the perpetuation of varieties & Species by means of selection' या शीर्षकाखाली प्रकाशित झाला. आश्चर्याची बाब म्हणजे त्यावर कुठलाच आक्षेप त्या वेळी घेतला गेला नाही. मात्र एक वर्षानंतर डार्विनने प्रकाशित केलेल्या त्याच्या "Origin of Species" ते बरीच खळबळ माजली. डार्विनच्या पुस्तकाची पहिली आवृत्ती हातोहात संपली. डार्विनचा सिद्धान्त वैज्ञानिकांनाही पचनी पडायला जड जात होता. तत्कालीन धर्मोपदेशकांनीही त्याला कडाडून विरोध केला. जो आजपर्यंत चालू आहे. हा सगळा इतिहास रंजक आणि उद्बोधक आहे.

डार्विनच्या सिद्धान्ताने विज्ञानाला नुसतीच एक नवीन दिशा दिली असे नाही तर अनेक धर्मसंकल्पनांनाही त्याने धक्का दिला. समाजशास्त्रासारख्या मानव्य शाखांमध्येही ''सामाजिक डार्विनवाद'' मांडला जाऊ लागला. अर्थातच ख्रिस्ती धर्माच्या या विरोधामुळेच उत्क्रांतिवाद सबळ करण्याकरता वैज्ञानिकांची कसोटी लागली आणि गेल्या दीडशे वर्षांमध्ये डार्विनलाही उपलब्ध नसलेले अनेक पुरावे उपलब्ध झाले. डार्विनच्या सिद्धान्तानंतरच या सिद्धान्ताला पूरक आणि पोषक माहिती मिळू लागली. १८६६ साली मेंडेल (Mendel) यांचा 'जनुकांच्या अनुवंशा'चा (Mendelian Inhemitance) सिद्धान्त मांडला गेला. पुढच्या १०० वर्षांत भूगर्भशास्त्रात अनेक शोध लागले. हजारोंनी जीवाश्म (Fossils) मिळाले, आणि त्यामुळे सिद्धान्ताच्या सिद्धतेकरता हवे असलेले ''हरवलेले दुवे'' (Missing Links) जोडले गेले. जनुकांच्या शास्त्रात प्रगती होत १९५२ साली जनुकांच्या रचनेचे सूत्र मांडले गेले. २००० साली मानवाच्या जनुकांचा नकाशा प्रथम संपूर्णपणे मांडला गेला. अनेक प्राण्यांच्या जनुकांचे नकाशेही उपलब्ध झाले. या उपलब्ध होत गेलेल्या माहितीच्या आधारे उत्क्रांतिवादाची सिद्धता वाढत गेली. आजही अनेक ''हरवलेले दुवे'' (Missing Links) असले, तरी मानवाची निर्मिती आणि उत्क्रांतीचा प्रवास हा 'एकपेशीय' ते 'बहुपेशीय', आणि त्यातूनच 'नैसर्गिक निवडी'च्या आधारे होत (Natural Selection), नव्या 'जाती' आणि 'प्रजातीं' ची निर्मिती या प्रक्रियेतून हा प्रवास साधार मांडला जाऊ लागला. यालाच आपण 'उत्क्रांतिवाद' म्हणतो. म्हणूनच 'रचनावाद' आणि 'उत्क्रांतिवाद' हे केव्हाही परस्परपूरक होऊ शकत नाहीत. पोपमहाशयांनाही हे चांगले माहीत असले तरी, बायबलच्या वचनांची कमी होणारी विश्वासर्हता टिकवण्याकरताच, बायबल आणि विज्ञानामध्ये दरी नसल्याचा आभास निर्माण करणारी विधाने ते करत आहेत. वेदांमध्ये आजचे सर्व आधुनिक विज्ञान आणि तंत्रज्ञान आहे हा आग्रही दावा आणि पोपमहाशयांचे उत्क्रांतिवाद नि रचनावादामध्ये परस्पर विरोध नसल्याचे विधान, यांमध्ये फारसा फरक नाही. वास्तवाचा स्वीकार केल्यामुळे या ग्रंथांचे पावित्र्य तसूभरही कमी होत नाही.

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.